
सुन्दरकाण्ड


जय श्री राम

## ॥ श्लोक ॥

**शान्तं शाश्वतमप्रमेयमनघं निर्वाणशान्तिप्रदं**
**ब्रह्माशम्भुफणीन्द्रसेव्यमनिशं वेदान्तवेद्यं विभुम् ।**
**रामाख्यं जगदीश्वरं सुरगुरुं मायामनुष्यं हरिं**
**वन्देऽहं करुणाकरं रघुवरं भूपालचूडामणिम् ॥१॥**

पूर्ण शांत, शाश्वत, अप्रमेय, पापरहित, सर्वदुःखान्तकारक असे कैवल्य देणारा, ब्रह्मदेव, शिव व शेष यांच्याद्वारे सतत वंदिला जाणारा, वेदान्ताद्वारे ज्याला जाणता येते असा, सर्वव्यापक, जगदीश्वर, देवाधिदेव, मानवत्वाच्या मर्यादा पाळणारा असा परमात्मा, श्रीहरि, अकारण कारुण्याचा निधी, राजाधिराज, रघुकुलश्रेष्ठ अशा 'राम' नाम धारण करणाऱ्यास मी वंदन करतो.



**नान्या स्पृहा रघुपते हृदयेऽस्मदीये**
**सत्यं वदामि च भवानखिलान्तरात्मा ।**
**भक्तिं प्रयच्छ रघुपुङ्गव निर्भरां मे**
**कामादिदोषरहितं कुरु मानसं च ॥२॥**

हे रघुपते रामा, तुमच्याशिवाय माझ्या हृदयी दुसऱ्या कशाचीही अभिलाषा नाही. मी हे सत्य सांगत आहे. आपण सर्वांचे मर्म जाणणारे, अन्तर्यामी आहात. हे रघुकुलगौरवा, मला आपली दृढ भक्ती द्या आणि माझे मन वासनादि दोषांपासून रहित असे करा.



अतुलितबलधामं हेमशैलाभदेहं
दनुजवनकृशानुं ज्ञानिनामग्रगण्यम् ।
सकलगुणनिधानं वानराणामधीशं
रघुपतिप्रियभक्तं वातजातं नमामि ।। ३ ।।

ज्या बलाची तुलनाच होऊ शकत नाही अशा अतुलनीय बलाचे धाम, ज्याचा देह जणू सुवर्णाच्या पर्वतासमान असा आहे, दानवरूपी वनाला जाळणारा अग्निस्वरूप असा, ज्ञानियांचा मुकुटमणी, सर्व सद्गुणांचा निधी, वानरांचा प्रधान, रामाचा अत्यंत प्रिय भक्त असणारा असा जो पवनपुत्र हनुमंत आहे, त्यास मी प्रणाम करतो.



# ।। श्रीरामचरितमानस - पञ्चम सोपान - सुन्दरकाण्डः ।।

**जामवंत के बचन सुहाए । सुनि हनुमंत हृदय अति भाए ।।**
**तब लगि मोहि परिखेहु तुम्ह भाई । सहि दुख कंद मूल फल खाई ।।१।।**

जांबुवंताने समुद्र-उल्लंघन करण्यापूर्वी मारुतीस त्याच्या बलाचे स्मरण करून दिले व रामकार्यास प्रेरणा दिली. वीररस चेतविणारी अशी जांबुवंताची वचने ऐकून मारुती अत्यंत प्रसन्नचित्त होऊन सर्व वानरांना म्हणाला, ‘‘बंधो, तुम्ही कष्ट सहन करून कंदमुळे-फळे खाऊन माझी परतेपर्यंत वाट पहा.’’



**जब लगि आवौं सीतहि देखी । होइहि काजु मोहि हरष बिसेषी ।**
**यह कहि नाइ सबन्हि कहुँ माथा । चलेउ हरषि हियँ धरि रघुनाथा ।।२।।**

‘‘जेव्हा मी सीतेचा शोध घेऊन येईन तेव्हा कार्य सफल झाल्यामुळे मला अत्यंत आनंद झालेला असेल’’,असे म्हणून हनुमंत सर्वांना नमस्कार करून रघुनाथ रामास हृदयी धारण करून आनंदाने निघाला.

**सिंधु तीर एक भूधर सुंदर । कौतुक कूदि चढेउ ता ऊपर ।।**
**बार बार रघुबीर सँभारी । तरकेउ पवनतनय बल भारी ।।३।।**

समुद्र किनाऱ्यावर एक सुरेख पर्वत होता. मारुती लीलया उडी मारून त्यावर चढला. वारंवार रघुवीर रामाचे स्मरण करून महाबली पवनसुत हनुमंताने त्यावरून उड्डाण केले.

**जेहिं गिरि चरन देइ हनुमंता । चलेउ सो गा पाताल तुरंता ।।**
**जिमि अमोघ रघुपति कर बाना । एही भाँति चलेउ हनुमाना ।।४।।**

ज्या पर्वतावर मारुतीने पाय ठेवला तो त्वरित पाताळात गेला. ज्याप्रमाणे रामाच्या हातून अमोघ वेगवान बाण सुटावा, जणू तसाच हनुमंत उड्डाण करून आकाशमार्गे जाऊ लागला. (समुद्र उल्लंघून लंकेस जाण्यासाठी मारुतीने उड्डाण केले.)



**जलनिधि रघुपतिदूत बिचारी । तैं मैनाक होहि श्रमहारी ।।५।।**

हा उड्डाण करणारा रामदूत आहे असा विचार करून समुद्राने मैनाक पर्वताला सांगितले की तू ह्याचा थकवा दूर करणारा हो. (ह्याला तुझ्यावर विसावू दे.)

**दोहा - हनूमान तेहि परसा कर पुनि कीन्ह प्रनाम ।**
**राम काजु कीन्हें बिनु मोहि कहाँ बिश्राम ।।६।।**



हनुमंताने त्याला हाताने स्पर्श करून नमस्कार केला व म्हणाला, "श्रीरामांचे कार्य केल्याशिवाय मला कुठली विश्रांती ?"

**जात पवनसुत देवन्ह देखा । जानैं कहुँ बल बुद्धि बिसेषा ।।**
**सुरसा नाम अहिन्ह कै माता । पठइन्हि आइ कही तेहिं बाता ।।७।।**

देवांनी मारुतीला जाताना पाहिले व त्याच्या बळ व बुद्धीची कसोटी घेण्यास

त्यांनी ‘सुरसा’ नावाच्या सर्पमातेस पाठविले. ती मारुतीसमीप येऊन म्हणाली,

**आज सुरन्ह मोहि दीन्ह अहारा । सुनत बचन कह पवनकुमारा ।।**
**राम काजु करि फिरि मैं आवौं । सीता कइ सुधि प्रभुहि सुनावौं ।।८।।**

‘‘तुझ्या रूपाने देवांनी आज मला आहारच दिला आहे.’’ यावर मारुती म्हणाला, ‘‘मी जेव्हा रामाचे कार्य करून परतेन, सीतेची बातमी प्रभुंना सांगेन,

**तब तव बदन पैठिहउँ आई । सत्य कहउँ मोहि जान दे माई ।।**
**कवनेहुँ जतन देइ नहिं जाना । ग्रससि न मोहि कहेउ हनुमाना ।।९।।**

तेव्हा मी तुझ्या मुखी प्रवेश करेन. मी हे सत्य सांगतो. माते, मला जाऊ दे.’’ पण ती काही केल्या जाऊ देत नाही असे पाहून, ‘‘तू मला गिळूच शकणार नाहीस ’’ असे मारुती तिला म्हणाला.



**जोजन भरि तेहीं बदनु पसारा । कपि तनु कीन्ह दुगुन बिस्तारा ।।**
**सोरह जोजन मुख तेहिं ठयऊ । तुरत पवनसुत बत्तिस भयऊ ।।१०।।**

तिने एक योजन रुंद जबडा पसरल्यावर मारुतीने आपले शरीर दुप्पट मोठे केले. तिने सोळा योजने मुख मोठे केले तर हनुमंत लागलीच बत्तीस योजनेएवढा विशाल झाला.

**जस जस सुरसा बदनु बढावा । तासु दून कपि रूप देखावा ।।**
**सत जोजन तेहिं आनन कीन्हा । अति लघु रूप पवनसुत लीन्हा ।।११।।**

जसजसे सुरसेने मुख वाढवले तसतसे मारुतीने आपले रूप त्याच्या दुप्पट करून दाखविले. पण जेव्हा तिने शंभर योजने जबडा फैलावला, तेव्हा मारुतीने अत्यंत लहान रूप धारण केले.

**बदन पइठि पुनि बाहेर आवा । मागा बिदा ताहि सिरु नावा ।।**
**मोहि सुरन्ह जेहि लागि पठावा । बुधि बल मरमु तोर मैं पावा ।।१२।।**



आणि तिच्या मुखात शिरून पुन्हा बाहेर निघून आला व नतमस्तक होऊन निरोप घेतला. मारुतीची ही शक्ती व युक्ती पाहून ती म्हणाली, ''मला तुमच्या बुद्धी व बलाचे मर्म कळले, ज्यासाठी देवांनी मला पाठवले होते.''

**दोहा - राम काजु सबु करिहहु तुम्ह बल बुद्धि निधान ।**
**आसिष देइ गई सो हरषि चलेउ हनुमान ॥१३॥**

''तुम्ही श्रीरामांचे सर्व कार्य कराल कारण तुम्ही बुद्धी व बलाचे निधान आहात.''अशा प्रकारे आशीर्वाद देऊन ती गेली. मारुतीदेखील हर्षित होऊन पुढे निघाला.



**निसिचरि एक सिंधु महुँ रहई । करि माया नभु के खग गहई ॥**
**जीव जंतु जे गगन उडाहीं । जल बिलोकि तिन्ह कै परिछाहीं ॥१४॥**

पुढे समुद्रात एक मायावी राक्षसी राहत होती, जी मायेद्वारे आकाशातील पक्षी पकडत असे.

जे जीवजंतु आकाशात उडत त्यांची सावली पाण्यात पडलेली पाहून

**गहइ छाहँ सक सो न उडाई । एहि बिधि सदा गगनचर खाई ।।**
**सोइ छल हनूमान कहँ कीन्हा । तासु कपटु कपि तुरतहिं चीन्हा ।।१५।।**

ती त्यांची सावली पकडत असे. ज्यामुळे ते उडू शकत नसत व पाण्यात येऊन पडत असत. याप्रकारे ती आकाशमार्गाने जाणाऱ्या खगांना नेहमी खात असे. त्या राक्षसीने तेच कपट हनुमंताशी केले पण मारुतीने तिचे कपट ताबडतोब ओळखले.

**ताहि मारि मारुतसुत बीरा । बारिधि पार गयउ मतिधीरा ।।**
**तहाँ जाइ देखी बन सोभा । गुंजत चंचरीक मधु लोभा ।।१६।।**

प्रचंड बुद्धिमान मारुती तिला मारून समुद्रापार गेला व तिथे जाऊन त्याने वनाची शोभा पाहिली. फुलातील मधाच्या लोभाने भुंगे गुंजारव करत होते.





**नाना तरु फल फूल सुहाए। खग मृग बृंद देखि मन भाए ॥**
**सैल बिसाल देखि एक आगें। ता पर धाइ चढेउ भय त्यागें ॥१७॥**

तऱ्हेतऱ्हेचे सुंदर वृक्ष, फळे, फुले आणि पशुपक्ष्यांचा समूह पाहून मारुती प्रसन्न झाला. पुढे एक विशाल पर्वत पाहून निर्भय असा तो धावत त्यावर चढला.

**उमा न कछु कपि कै अधिकाई। प्रभु प्रताप जो कालहि खाई ॥**
**गिरि पर चढि लंका तेहिं देखी। कहि न जाइ अति दुर्ग बिसेषी ॥१८॥**

शिव उमेस म्हणतात, “श्रीरामप्रभुंचा प्रताप असणारा असा हा कपि काळालाही भक्षण करेल असा आहे, ह्या कपिवराहून अधिक प्रतापी कुणीच नाही.” पर्वतावर चढून मारुतीने लंका पाहिली. त्या दुर्गाची विशेषता अवर्णनीय होती.

**अति उतंग जलनिधि चहुँ पासा। कनक कोट कर परम प्रकासा ॥१९॥**

तो किल्ला अत्यंत उंच असून त्याच्या चारही बाजूला समुद्र होता. सोन्याचा तो किल्ला अतिशय लखाखत आहे असे मारुतीने पाहिले.

**छंद- कनक कोट बिचित्र मनि कृत सुंदरायतना घना**
**चउहट्ट हट्ट सुबट्ट बीथीं चारु पुर बहु बिधि बना ।**
**गज बाजि खच्चर निकर पदचर रथ बरूथन्हि को गनै**
**बहुरूप निसिचर जूथ अतिबल सेन बरनत नहिं बनै ॥२०॥**

तऱ्हेतऱ्हेच्या मण्यांनी जडवलेल्या त्या सोन्याच्या किल्ल्यात अनेक सुंदर घरे आहेत. नगरात विविध प्रकारे बनवलेले सुंदर चौक, बाजार, मार्ग, गल्ल्या व बोळ आहेत. हत्ती, घोडे, खेचरांचे समूह, पायी चालणारे व रथांचे समूह यांना कोण बरे मोजू शकेल? आणि विविध रूपे धारण केलेल्या राक्षसांच्या अतिबलशाली जथ्यांनी बनलेल्या राक्षससेनेचे वर्णनही करता येणार नाही.



**बन बाग उपबन बाटिका सर कूप बापीं सोहहीं**
**नर नाग सुर गंधर्ब कन्या रूप मुनि मन मोहहीं ।**
**कहुँ माल देह बिसाल सैल समान अतिबल गर्जहीं**
**नाना अखारेन्ह भिरहिं बहुबिधि एक एकन्ह तर्जहीं ॥२१॥**

वन, उद्यान, उपवन, फुलांचे ताटवे, तलाव, विहिरी व बावड्या शोभत आहेत. मनुष्य, नाग, देवता आणि गंधर्वकन्यांचे सौंदर्य, मुनींच्या मनाला मोहित करेल असे आहे. कोठे पर्वताप्रमाणे विशाल शरीराचे अत्यंत शक्तिशाली मल्ल गर्जना करत आहेत आणि अनेक आखाड्यांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे एकमेकांना लोळवत आहेत.

**करि जतन भट कोटिन्ह बिकट तन नगर चहुँ दिसि रच्छहीं**
**कहुँ महिष मानुष धेनु खर अज खल निसाचर भच्छहीं ।**
**एहि लागि तुलसीदास इन्ह की कथा कछु एक है कही**
**रघुबीर सर तीरथ सरीरन्हि त्यागि गति पैहहिं सही ॥२२॥**



अक्राळविक्राळ शरीराचे कोट्यवधी पहारेकरी निकराने चारही दिशांना रक्षण करत आहेत. काही दुष्ट राक्षस म्हशी, माणसे, गायी, गाढव व बकरे खात आहेत. तुलसीदासजी ह्यांचे वर्णन कथन करत आहेत कारण श्रीरामांच्या बाणरूपी तीर्थात ह्यांना शरीर त्यागावे लागणार असून त्यामुळे हे नक्कीच सद्गती  प्राप्त करून घेतील.



**दोहा - पुर रखवारे देखि बहु कपि मन कीन्ह बिचार ।**
**अति लघु रूप धरौं निसि नगर करौं पइसार ।।२३।।**

अनेक पहारेकरी पाहून हनुमंताने विचार केला की अत्यंत छोटे रूप धारण करून रात्रीच्या वेळी नगरात प्रवेश करेन.

**मसक समान रूप कपि धरी । लंकहि चलेउ सुमिरी नरहरी ।।**
**नाम लंकिनी एक निसिचरी । सो कह चलेसि मोहि निंदरी ।।२४।।**

मारुती डासाप्रमाणे छोटे रूप धारण करून श्रीरामांचे स्मरण करून लंकेकडे निघाला. लंकिनी नावाची जी पहारेकरीण राक्षसी होती, ती त्याला म्हणाली, ‘‘तू माझा अनादर करून निघाला आहेस.

**जानेहि नहीं मरमु सठ मोरा । मोर अहार जहाँ लगि चोरा ।।**
**मुठिका एक महा कपि हनी । रुधिर बमत धरनीं ढनमनी ।।२५।।**

अरे चोरा, तुला माझे रहस्य माहीत नाही. जितके चोर आहेत ते सगळे माझा आहार आहेत.’’ हनुमंताने तिला एक ठोसा मारताच रक्ताची उलटी होऊन ती जमिनीवर पडली.

**पुनि संभारि उठी सो लंका । जोरि पानि कर बिनय ससंका ।।**
**जब रावनहि ब्रह्म बर दीन्हा । चलत बिरंचि कहा मोहि चीन्हा ।।२६।।**



पुन्हा स्वत:ला सावरून लंकिनी परत उठली व घाबरून हात जोडून विनवू लागली.

ती म्हणाली की जेव्हा ब्रह्मदेवाने रावणाला वर दिला होता, तेव्हा जाताना त्याने मला अशी खूण सांगितली होती की

**बिकल होसि तैं कपि के मारे । तब जानेसु निसिचर संघारे ।।**
**तात मोर अति पुन्य बहूता । देखेउँ नयन राम कर दूता ।।२७।।**

जेव्हा तू वानराच्या मारण्याने घायाळ होशील, तेव्हा समज की राक्षसांचा संहार होईल. हे तात! माझे मोठे पुण्य आहे की मी माझ्या डोळ्यांनी श्रीरामांच्या दूताचे दर्शन घेतले.

**दोहा - तात स्वर्ग अपबर्ग सुख धरिअ तुला एक अंग ।**
**तूल न ताहि सकल मिलि जो सुख लव सतसंग ।।२८।।**

हे तात! स्वर्ग व मोक्षाचे सर्व सुख तराजूवर एका बाजूला ठेवले तरी ते सर्व सुख मिळूनदेखील अगदी अल्पशा सत्संगाच्या तुलनेचे होणार नाही.



**प्रबिसि नगर कीजे सब काजा । हृदयँ राखि कोसलपुर राजा ।।**
**गरल सुधा रिपु करहिं मिताई । गोपद सिंधु अनल सितलाई ।।२९।।**

आपण नगरात शिरून सर्व काम करावे. श्रीरामांना हृदयात धारण करून काम करताना विषदेखील अमृत होते व शत्रूदेखील त्याच्याशी मैत्री करतो. समुद्र गायीच्या खुराच्या आकाराच्या खड्ड्यात सामावला जातो व अग्नीचा दाहकपणा दूर होतो.

**गरुड सुमेरु रेनु सम ताही । राम कृपा करि चितवा जाही ।।**
**अति लघु रूप धरेउ हनुमाना । पैठा नगर सुमिरि भगवाना ।।३०।।**

ज्याला श्रीरामांनी कृपादृष्टीने पाहिले आहे, त्याच्यासाठी मेरु पर्वताची विशालता धुलिकणाप्रमाणे होते. मग हनुमंताने अत्यंत छोटे रूप धारण करुन रामप्रभुंचे स्मरण करून लंकापुरीत प्रवेश केला.



**मंदिर मंदिर प्रति करि सोधा । देखे जहँ तहँ अगनित जोधा ।।**
**गयउ दसानन मंदिर माहीं । अति बिचित्र कहि जात सो नाहीं ।।३१।।**

सीतेचा शोध घेण्यासाठी मारुतीने घराघरात जाऊन शोध घेतला, तेव्हा त्याने तेथे असंख्य योद्ध्यांना पाहिले. तो रावणाच्या महालात गेला. तो महाल असा विचित्र होता की सांगताही येणार नाही.

**सयन किएँ देखा कपि तेही । मंदिर महुँ न दीखि बैदेही ।।**
**भवन एक पुनि दीख सुहावा । हरि मंदिर तहँ भिन्न बनावा ।।३२।।**

मारुतीने रावणाला झोपलेले पाहिले परंतु त्या महालात कोठेही वैदेही (सीता) दिसली नाही. मग पुढे त्याने एक सुंदर घर पाहिले. तेथे श्रीराम प्रभुंचे एक स्वतंत्र मंदिर बांधलेले होते.

**दोहा - रामायुध अंकित गृह सोभा बरनि न जाइ ।**
**नव तुलसिका बृंद तहँ देखि हरष कपिराइ ।।३३।।**



श्रीरामांच्या आयुधांची चित्रे काढलेल्या त्या घराची शोभा वर्णन करता येणार नाही. तेथे नवीन हिरवेगार तुळशीवृंदावन पाहून मारुतीला हर्ष झाला.

**लंका निसिचर निकर निवासा । इहाँ कहाँ सज्जन कर बासा ॥**
**मन महुँ तरक करैं कपि लागा । तेहीं समय बिभीषनु जागा ॥३४॥**

ही लंका तर राक्षसांचे निवासस्थान, मग येथे सज्जनाचा वास कसा काय? ह्याप्रकारे हनुमंत मनात विचार करू लागला, त्याच वेळेस बिभीषणाला जाग आली.

**राम राम तेहिं सुमिरन कीन्हा । हृदयँ हरष कपि सज्जन चीन्हा ॥**
**एहि सन हठि करिहउँ पहिचानी । साधु ते होइ न कारज हानी ॥३५॥**

जागे होताच त्याने रामनामाचे स्मरण केले. हीच सज्जनपणाची खूण आहे, हे ओळखून हनुमंताला हृदयापासून आनंद झाला व त्याने निर्णय घेतला की ह्याच क्षणी ह्याच्याशी परिचय करून घेईन. सज्जनांमुळे कार्याची हानी होत नाही.



**बिप्र रूप धरि बचन सुनाए। सुनत बिभीषन उठि तहँ आए॥**
**करि प्रनाम पूँछी कुसलाई। बिप्र कहहु निज कथा बुझाई॥३६॥**

ब्राह्मणाचे रूप धारण करुन मारुतीने हाक मारली, ती ऐकताच बिभीषण उठून हनुमंताजवळ आला आणि प्रणाम करून त्याचे क्षेम कुशल विचारले. हे ब्राह्मणा, आपल्याबद्दल काही सांगावे.

**की तुम्ह हरि दासन्ह महँ कोई। मोरें हृदय प्रीति अति होई॥**
**की तुम्ह रामु दीन अनुरागी। आयहु मोहि करन बडभागी॥३७॥**

आपण हरिदासांपैकी कोणी आहात का? माझ्या हृदयात आपल्याविषयी मोठे प्रेम उत्पन्न होते आहे. का आपण दीनांवर प्रेम करणारे श्रीराम आहात आणि माझे भाग्य उजळवण्याकरता येथे आला आहात ?



**दोहा - तब हनुमंत कही सब राम कथा निज नाम ।**
**सुनत जुगल तन पुलक मन मगन सुमिरि गुन ग्राम ।।३८।।**

तेव्हा हनुमंताने स्वत:चे नाव सांगून श्रीरामांची सगळी कथा सांगितली व ते ऐकताच दोघांची शरीरे पुलकित झाली आणि श्रीरामांच्या गुणसमूहाची आठवण करून दोघे प्रेममग्न झाले.

**सुनहु पवनसुत रहनि हमारी । जिमि दसनन्हि महुँ जीभ बिचारी ।।**
**तात कबहुँ मोहि जानि अनाथा । करिहहिं कृपा भानुकुल नाथा ।।३९।।**

तेव्हा बिभीषण म्हणाला, ‘‘हे हनुमंता ! ऐका ! माझे राहणे तर येथे याप्रमाणे आहे, जशी दातांमध्ये जीभ. हे तात! मला अनाथ समजून सूर्यकुलाचे स्वामी श्रीराम माझ्यावर कृपा करतील काय?’’



**तामस तनु कछु साधन नाहीं । प्रीति न पद सरोज मन माहीं ।।**
**अब मोहि भा भरोस हनुमंता । बिनु हरिकृपा मिलहिं नहिं संता ।।४०।।**

माझे शरीर तामसी आहे. मी काहीं साधना केलेली नाही. माझ्या मनात श्रीरामांच्या चरणकमलांविषयी प्रेमभावदेखील नाही. हनुमंता ! पण आता मला विश्वास वाटतो कारण ईश्वराच्या कृपेशिवाय संतजन भेटत नाहीत.

**जौं रघुबीर अनुग्रह कीन्हा । तौ तुम्ह मोहि दरसु हठि दीन्हा ।।**
**सुनहु बिभीषन प्रभु कै रीती । करहिं सदा सेवक पर प्रीति ।।४१।।**

“जेव्हा श्रीरामांनी कृपा केली तेव्हाच तुम्ही साक्षात दर्शन दिले आहे.” मारुतीराय म्हणाले, “हे बिभीषणा ऐक! प्रभुंची तर ही रीतच आहे की ते सेवकांवर सदैव प्रेम करतातच.”



**कहहु कवन मैं परम कुलीना । कपि चंचल सबहीं बिधि हीना ।।**
**प्रात लेइ जो नाम हमारा । तेहि दिन ताहि न मिलै अहारा ।।४२।।**

"मला सांगा की मी तरी कोठे मोठा कुलीन आहे ? वानरे चंचल असून विधिहीन असतात. सकाळीसकाळी कोणी आमचे नाव घेतले तर त्याला दिवसभर जेवणदेखील मिळत नाही."

**दोहा - अस मैं अधम सखा सुनु मोहू पर रघुबीर ।**
**कीन्ही कृपा सुमिरि गुन भरे बिलोचन नीर ।।४३।।**

"ऐक मित्रा ! मी हा असा अधम असूनसुद्धा रघुनाथांनी माझ्यावर कृपा केली." श्रीरामांच्या ह्या गुणांचे स्मरण करून हनुमंताचे डोळे पाण्याने भरून आले.

**जानतहूँ अस स्वामि बिसारी । फिरहिं ते काहे न होहिं दुखारी ।।**
**एहि बिधि कहत राम गुन ग्रामा । पावा अनिर्बाच्य बिश्रामा ।।४४।।**



सर्व जाणूनही अशा स्वामीला जे विसरून जातात, ते का बरे भटकत फिरणार नाहीत? दुःखी का होणार नाहीत? अशा प्रकारे श्रीरामांचे गुण सांगून मारुतीने असे शांती व समाधान प्राप्त केले की ज्याचे मुखाने वर्णन करता येणार नाही.

**पुनि सब कथा बिभीषन कही । जेहि बिधि जनकसुता तहँ रही ॥**
**तब हनुमंत कहा सुनु भ्राता । देखी चहउँ जानकी माता ॥४५॥**

मग बिभीषणाने सीता तिथे जशी राहत होती ते वर्णन करून सांगितले. तेव्हा मारुती म्हणाला, “हे बंधो, ऐका ! मी जानकीमातेचे दर्शन करू इच्छितो.”

**जुगुति बिभीषन सकल सुनाई । चलेउ पवनसुत बिदा कराई ॥**
**करि सोइ रूप गयउ पुनि तहवाँ । बन असोक सीता रह जहवाँ ॥४६॥**

त्यावर बिभीषणाने सगळी युक्ती सांगितली. हनुमंत त्याचा निरोप घेऊन निघाला.



पुन्हा तेच सूक्ष्म रूप घेऊन तो अशोकवनात सीता जेथे होती, तेथे गेला.

**देखि मनहि महुँ कीन्ह प्रनामा । बैठेहिं बीति जात निसि जामा ।।**
**कृस तनु सीस जटा एक बेनी । जपति हृदयँ रघुपति गुन श्रेनी ।।४७।।**

सीतामाईला पाहून मारुतीने मनापासून नमस्कार केला. तेथे बसून रात्रीचे चार प्रहर लोटले. सीतेचे शरीर कृश झाले आहे. केसांची एक वेणी घातलेली आहे व त्या रघुनाथांच्या गुणांचे हृदयामध्ये सतत स्मरण करत आहेत.

**दोहा - निज पद नयन दिएँ मन राम पद कमल लीन ।**
**परम दुखी भा पवनसुत देखि जानकी दीन ।।४८।।**

सीतेचे डोळे स्वतःच्या पायाकडे आहेत व त्यांचे मन श्रीरामाच्या चरणी लीन आहे. सीतेला अशा दुःखी अवस्थेत पाहून मारुतीला दारुण दुःख झाले.



तरु पल्लव महुँ रहा लुकाई । करइ बिचार करौं का भाई ।।
तेहि अवसर रावनु तहँ आवा । संग नारि बहु किएँ बनावा ।।४९।।

मारुती वृक्षाच्या पानामागे दडून राहिला व विचार करू लागला की, मी काय करू? त्याच वेळेस रावण पुष्कळ नटल्याथटलेल्या स्त्रियांसह तेथे आला.

बहु बिधि खल सीतहि समुझावा । साम दाम भय भेद देखावा ।।
कह रावनु सुनु सुमुखि सयानी । मंदोदरी आदि सब रानी ।।५०।।

त्या दुष्ट रावणाने सामोपचार, वैभव, दहशत घालून तसेच कपटाचा अवलंब करून सीतेस अनेक प्रकारे वश करून घेण्याचा प्रयत्न केला. रावण म्हणाला, ''हे सुमुखे,चतुर स्त्रिये ऐक! मंदोदरी आदि सर्व राण्यांना

तव अनुचरीं करउँ पन मोरा । एक बार बिलोकु मम ओरा ।।
तृन धरि ओट कहति बैदेही । सुमिरि अवधपति परम सनेही ।।५१।।



मी तुझी दासी करीन, हा माझा निश्चय आहे. तू एकदा माझ्याकडे पहा.'' रावणाकडे न पाहता हाताने गवताची काडी आड धरून सीता आपले परमप्रिय अयोध्याधीश श्रीरामाचे स्मरण करून म्हणाली,

**सुनु दसमुख खद्योत प्रकासा । कबहुँ कि नलिनी करइ बिकासा ॥**
**अस मन समुझु कहति जानकी । खल सुधि नहिं रघुबीर बान की ॥५२॥**

''हे दशमुखी रावणा ! ऐक ! कधी काजव्याच्या प्रकाशाने कमळे फुलतात का? तू हेच लक्षात घे. अरे, दुष्टा! तुला रघुवीर रामाच्या बाणांची माहिती नाही का?

**सठ सूनें हरि आनेहि मोही । अधम निलज्ज लाज नहिं तोही ॥५३॥**

अरे कपट्या! तू मला एकटी पाहून हरण करून आणलेस. अरे अधमा, अरे निर्लज्जा, तुला कसलीच लाजलज्जा नाही.''

दोहा - आपुहि सुनि खद्योत सम रामहि भानु समान ।
परुष बचन सुनि काढि असि बोला अति खिसिआन ।।५४।।

आपल्याला काजव्याप्रमाणे व श्रीरामाला सूर्याप्रमाणे म्हटलेले सीतेचे कठोर वचन ऐकताच म्यानातून तलवार बाहेर काढून रावण भयंकर रागावून म्हणाला,

सीता तैं मम कृत अपमाना । कटिहउँ तव सिर कठिन कृपाना ।।
नाहिं त सपदि मानु मम बानी । सुमुखि होति न त जीवन हानी ।।५५।।

''सीते, तू माझा अपमान केला आहेस म्हणून मी तुझे शिर कठोरपणे या कृपाणाने कापून टाकीन. तू जर माझे त्वरित ऐकले नाहीस तर हे सुमुखी, आता तुझ्या जीवनाचा अंत नक्कीच होईल.''

स्याम सरोज दाम सम सुंदर । प्रभु भुज करि कर सम दसकंधर ।।
सो भुज कंठ कि तव असि घोरा । सुनु सठ अस प्रवान पन मोरा ।।५६।।



सीता म्हणाली, ‘‘हे रावणा ! एक तर सावळ्या कमळाच्या माळेप्रमाणे सुंदर तसेच हत्तीच्या सोंडेप्रमाणे दृढ असणाऱ्या श्रीराम प्रभुंच्या भुजा माझ्या कंठी असतील किंवा तुझी भयानक तलवार ! ऐक ! ही माझी सत्य प्रतिज्ञा आहे.’’

**चंद्रहास हरु मम परितापं । रघुपति बिरह अनल संजातं ।।**
**सीतल निसित बहसि बर धारा । कह सीता हरु मम दुख भारा ।।५७।।**

सीता म्हणाली, ‘‘हे तलवारी,माझे दुःख तू दूर कर.रघुनाथांचा विरह हा धगधगत्या अग्नीप्रमाणे आहे आणि तू तर माझ्यासाठी शीतल,तीव्र व श्रेष्ठ प्रवाहाप्रमाणे आग विझवणारी आहेस.माझ्या ह्या दुःखाचा भार तू हरण कर.’’(रावणाच्या तलवारीस ‘चन्द्रहास’ संबोधले आहे.)

**सुनत बचन पुनि मारन धावा । मयतनयाँ कहि नीति बुझावा ।।**
**कहेसि सकल निसिचरिन्ह बोलाई । सीतहि बहु बिधि त्रासहु जाई ।।५८।।**



सीतेचे हे बोलणे ऐकून रावण परत तिला मारायला धावला. तेव्हा  मयदानवाची कन्या मंदोदरी हिने नीतिच्या गोष्टी सांगून त्याला समजावले. रावणाने सर्व राक्षसींना बोलावून घेतले व त्यांना सांगितले, ‘‘ सर्वजणी मिळून सीतेला विविध प्रकारे त्रास द्या.

**मास दिवस महुँ कहा न माना । तौ मैं मारबि काढि कृपाना ।।५९।।**

हिने जर एक महिन्याच्या आत माझे ऐकले नाही तर मी हिला खड्गाने मारेनच.’’

**दोहा - भवन गयउ दसकंधर इहाँ पिसाचिनी बृंद ।**
**सीतहि त्रास देखावहिं धरहिं रूप बहु मंद ।।६०।।**

इकडे रावण निघून गेल्यावर सर्व राक्षसी अनेक भयंकर रूपे धारण करून सीतेला त्रास देऊ लागल्या.



**त्रिजटा नाम राच्छसी एका । राम चरन रति निपुन बिबेका ।।**
**सबन्हौ बोलि सुनाएसि सपना । सीतहि सेइ करहु हित अपना ।।६१।।**

त्या राक्षसींमध्ये त्रिजटा नावाची एक राक्षसी होती. तिचे श्रीरामांच्या चरणांवर प्रेम होते व ती विवेकी होती. तिने राक्षसींना बोलावून आपले स्वप्न सांगितले. ती म्हणाली, ''तुम्ही सीतेची सेवा करून आपले कल्याण करून घ्या.''



**सपनें बानर लंका जारी । जातुधान सेना सब मारी ।।**
**खर आरूढ नगन दससीसा । मुंडित सिर खंडित भुज बीसा ।।६२।।**

ती त्यांना म्हणाली की, ''मी स्वप्नात पाहिले की एका वानराने लंका जाळली आणि राक्षसांच्या सेनेला मारून टाकले. नागवा रावण गाढवावर बसला आहे. त्याचे डोके मुंडन केलेले आहे व वीस बाहू कापले गेले आहेत.

**एहि बिधि सो दच्छिन दिसि जाई । लंका मनहुँ बिभीषन पाई ।।**
**नगर फिरी रघुबीर दोहाई । तब प्रभु सीता बोलि पठाई ।।६३।।**

अशा प्रकारे तो दक्षिण दिशेला म्हणजे यमाकडे जात आहे व लंका बिभीषणाला मिळाली आहे. नगरात श्रीरामांची दवंडी पिटली गेली. श्रीरामांनी सीतेला बोलावले आहे,राम सीतेला पुन्हा घेऊन गेले आहेत.

**यह सपना मैं कहउँ पुकारी । होइहि सत्य गएँ दिन चारी ।।**
**तासु बचन सुनि ते सब डरीं । जनकसुता के चरनन्हि परीं ।।६४।।**

तुम्हाला मी हाकारून सांगते की, हे स्वप्न अगदी थोड्या दिवसातच सत्य होईल.'' तिचे हे बोलणे ऐकून सगळ्या राक्षसी घाबरल्या व जनककन्या सीतेच्या पाया पडल्या.

**दोहा - जहँ तहँ गईं सकल तब सीता कर मन सोच ।**
**मास दिवस बीतें मोहि मारिहि निसिचर पोच ।।६५।।**



त्यानंतर त्या इकडे तिकडे गेल्या. सीता मनात विचार करू लागली की एक महिना झाल्यानंतर नीच रावण मला मारून टाकेल.

**त्रिजटा सन बोलीं कर जोरी । मातु बिपति संगिनि तैं मोरी ॥**
**तजौं देह करु बेगि उपाई । दुसह बिरहु अब नहिं सहि जाई ॥६६॥**

ती त्रिजटेला हात जोडून म्हणाली की, "हे माते ! तू माझ्या विपत्तीसमयातील सखी आहेस. मला असा उपाय सांग की ज्यायोगे मी पटकन देहत्याग करेन. आता हा असह्य विरह मला सहन होत नाही.

**आनि काठ रचु चिता बनाई । मातु अनल पुनि देहि लगाई ॥**
**सत्य करहि मम प्रीति सयानी । सुनै को श्रवन सूल सम बानी ॥६७॥**

तू लाकडे आणून चिता रच व मी त्या चितेवर जाऊन बसल्यावर अग्नी प्रज्वलित कर. तू माझ्या प्रेमाला सत्य कर. शूलाप्रमाणे असणारी त्रासदायक अशी रावणाची वाक्ये कानाने कशी ऐकणार?"



**सुनत बचन पद गहि समुझाएसि । प्रभु प्रताप बल सुजसु सुनाएसि ।।**
**निसि न अनल मिल सुनु सुकुमारी । अस कहि सो निज भवन सिधारी ।।६८।।**

सीतेचे हे बोलणे ऐकताच त्रिजटेने पाय धरून सीतेला समजावले व श्रीरामांचे सुयश, प्रताप व बल सांगितले. त्रिजटा म्हणाली, ‘‘हे सुकुमारी ! ह्या रात्री विस्तव मिळणार नाही .’’ असे म्हणून ती तिच्या घरी गेली.

**कह सीता बिधि भा प्रतिकूला । मिलिहि न पावक मिटिहि न सूला ।।**
**देखिअत प्रगट गगन अंगारा । अवनि न आवत एकउ तारा ।।६९।।**

सीता म्हणाली, ‘‘विधाताच प्रतिकूल झाला आहे. विस्तवही मिळत नाही व माझे दुःखही दूर होत नाही. आकाशात अग्नीप्रमाणे असणारे अनेक तारे दिसत आहेत, पण त्यातील एकसुद्धा तारा पृथ्वीवर येत नाही.



**पावकमय ससि स्रवत न आगी। मानहुँ मोहि जानि हतभागी ।।**
**सुनहि बिनय मम बिटप असोका। सत्य नाम करु हरु मम सोका ।।७०।।**

मजसाठी अग्निमय असलेला चंद्रदेखील मला हतभागिनी समजून आगीचा वर्षाव करत नाही. हे अशोक वृक्षा, तू तरी माझी विनंती ऐक. तू माझा शोक हरण कर व आपले नाव सत्य कर.

**नूतन किसलय अनल समाना। देहि अगिनि जनि करहि निदाना ।।**
**देखि परम बिरहाकुल सीता। सो छन कपिहि कलप सम बीता ।।७१।।**

तुझी कोवळी पाने आगीप्रमाणे आहेत. तू मला विस्तव दे. माझा विरह सहन करण्याच्या अंतापर्यंत जाऊ देऊ नकोस.'' सीतेला विरहाने व्याकूळ झालेले पाहून, ते क्षण मारुतीला जणू कल्पाप्रमाणे वाटले.

**दोहा - कपि करि हृदयँ बिचार दीन्हि मुद्रिका डारि तब ।**
**जनु असोक अंगार दीन्ह हरषि उठि कर गहेउ ॥७२॥**

मारुतीने अंतःकरणपूर्वक विचार करून रामप्रभुंनी दिलेली अंगठी खाली टाकली. अशोकाने विस्तवच दिला आहे, असे वाटून जानकीने अत्यंत आनंदाने ती अंगठी उचलली.

**तब देखी मुद्रिका मनोहर । राम नाम अंकित अति सुंदर ॥**
**चकित चितव मुदरी पहिचानी । हरष बिषाद हृदयँ अकुलानी ॥७३॥**

तेव्हा सीतेने रामनाम कोरलेले असल्यामुळे अतिशय सुंदर दिसणारी ती अंगठी पाहिली व लगेचच त्या अंगठीला ओळखल्यामुळे ती आनंदित झाली; परंतु लगेचच कातरशंकेने हृदयी व्याकूळ झाली.



**जीति को सकइ अजय रघुराई । माया तें असि रचि नहिं जाई ।।**
**सीता मन बिचार कर नाना । मधुर बचन बोलेउ हनुमाना ।।७४।।**

रघुनाथ तर अजय आहेत, त्यांना कोण जिंकू शकते व ही अंगठी कोण आणू शकतो? तसेच मायेने अशी अंगठी करता येणार नाही. याप्रकारे सीता नाना प्रकारे विचार करू लागली. इतक्यात मारुतीराय अत्यंत मधुर वाणीने बोलू लागले.



**रामचंद्र गुन बरनैं लागा । सुनतहिं सीता कर दुख भागा ।।**
**लागीं सुनैं श्रवन मन लाई । आदिहु तें सब कथा सुनाई ।।७५।।**

ते श्रीरामांचे गुणवर्णन करू लागले. ते ऐकताच सीतेचे दुःख पळून गेले. ती मन लावून ऐकू लागली. मारुतीने सुरुवातीपासून सर्व कथा सांगितली.

**श्रवनामृत जेहिं कथा सुहाई । कही सो प्रगट होति किन भाई ॥**
**तब हनुमंत निकट चलि गयऊ । फिरि बैठीं मन बिसमय भयऊ ॥७६॥**



सीता म्हणाली, कानांना अमृताप्रमाणे वाटणारी ही सुंदर कथा ज्याने सांगितली तो प्रकट का बरे होत नाही ? तेव्हा हनुमंत सीतेपाशी गेले. सीता दुसरीकडे तोंड फिरवून बसली. (परपुरुषाकडे न पाहणाऱ्या सीतेने साहजिकच अनोळखी व्यक्ती पाहून तोंड फिरविले.) वानराच्या मुखातून रामाचे गुणसंकीर्तन ऐकून सीतेला आश्चर्य वाटले.

**राम दूत मैं मातु जानकी । सत्य सपथ करुनानिधान की ॥**
**यह मुद्रिका मातु मैं आनी । दीन्हि राम तुम्ह कहँ सहिदानी ॥७७॥**



मारुती म्हणाला, "हे माते जानकी ! मी श्रीरामचंद्रांचा दूत आहे. करुणानिधान प्रभुंची शपथ घेऊन सत्य तेच सांगतो आहे. हे माते ! ही अंगठी मीच आणली आहे. श्रीरामांनी ही आपणासाठी खूण म्हणून दिली आहे ."

**नर बानरहि संग कहु कैसें । कही कथा भइ संगति जैसें ।।७८।।**

सीतेने विचारले, ''नर व वानरांची मैत्री कशी झाली ?'' मारुतीने त्यांची जशी भेट झाली होती, ती कथा सांगितली.

**दोहा - कपि के बचन सप्रेम सुनि उपजा मन बिस्वास।**
**जाना मन क्रम बचन यह कृपासिंधु कर दास ।।७९।।**

मारुतीरायाचे प्रेमपूर्ण बोलणे ऐकून सीतेला विश्वास वाटला आणि तिची खात्री पटली की हा कपिवर मन, कर्म आणि वचनाने कृपासिंधु श्रीरामाचा दासच आहे.

**हरिजन जानि प्रीति अति गाढी । सजल नयन पुलकावलि बाढी ।।**
**बूडत बिरह जलधि हनुमाना । भयहु तात मो कहुँ जलजाना ।।८०।।**

रामप्रभुचा भक्त जाणून तिच्या मनात अगाध प्रेम निर्माण झाले. नेत्र सजल झाले. शरीर रोमांचित झाले. सीता मारुतीला म्हणाली, ''हे तात! मी विरहाच्या समुद्रात बुडत आहे. तुम्ही माझ्याकरिता जणू जहाज झालात.



**अब कहु कुसल जाउँ बलिहारी । अनुज सहित सुख भवन खरारि ॥**
**कोमलचित कृपाल रघुराई । कपि केहि हेतु धरि निठुराई ॥८१॥**

नाथ रामप्रभुंबद्दल ऐकण्यास मी अत्यंत उत्सुक आहे. आता तुम्ही अनुज लक्ष्मणासह असणाऱ्या, खर दानवाचा वध करणाऱ्या सुखधाम श्रीरामप्रभुंचे कुशल सांगा. रघुनाथ तर कोमल हृदयाचे व कृपाळू आहेत. मग हे कपिश्रेष्ठा, अजून मला ते का भेटत नाहीत?

**सहज बानि सेवक सुखदायक । कबहुँक सुरति करत रघुनायक ॥**
**कबहुँ नयन मम सीतल ताता । होइहहिं निरखि स्याम मृदु गाता ॥८२॥**

निजसेवकांना सुखदायक असा बाणा असणारे रघुनायक कधी माझी आठवण काढतात का ? हे तात ! प्रभुंचे श्यामल व कोमल रूप पाहून माझे डोळे कधी बरं सुखावतील?



**बचनु न आव नयन भरे बारी । अहह नाथ हौं निपट बिसारी ।।**
**देखि परम बिरहाकुल सीता । बोला कपि मृदु बचन बिनीता ।।८३।।**

सीतेच्या मुखातून शब्द निघेनात. डोळे अश्रूंनी  भरून आले. हे नाथ! आपण मला अगदीच विसरलात.'' सीतेला विरहाने व्याकुळ झालेली पाहून मारुतीराय कोमल व विनम्रपणे म्हणाले,

**मातु कुसल प्रभु अनुज समेता । तव दुख दुखी सुकृपा निकेता ।।**
**जनि जननी मानहु जियँ ऊना । तुम्ह ते प्रेमु राम कें दूना ।।८४।।**

''हे माते ! प्रभु आपल्या धाकट्या भावासहित कुशल आहेत. पूर्णकृपाधाम प्रभु आपल्या विरहामुळे दुःखी असतात. हे माते ! आपण स्वतःला उणे समजू नका. श्रीरामांच्या हृदयात आपल्याबद्दल आपल्या दुप्पट प्रेम आहे.



दोहा - रघुपति कर संदेसु अब सुन जननी धरि धीर ।
अस कहि कपि गदगद भयउ भरे बिलोचन नीर ।।८५।।

आई ! आता धीर धरून श्रीरामांचा संदेश ऐक.'' असे म्हणून मारुतीरायांचा स्वर गद्‌गद झाला व त्यांचे डोळे भरून आले.

कहेउ राम बियोग तव सीता । मो कहुँ सकल भए बिपरीता ।।
नव तरु किसलय मनहुँ कृसानू । कालनिसा सम निसि ससि भानू ।।८६।।

रामाचा निरोप सीतेला सांगण्यास मारुतीराय म्हणाले, ''श्रीरामांनी सांगितले आहे की हे सीते, तुझ्या विरहाने मला सगळ्या गोष्टी विपरीत झाल्या आहेत. वृक्षाची कोवळी पाने आगीप्रमाणे, रात्र काळरात्रीप्रमाणे व चंद्र सूर्याप्रमाणे झाला आहे.''

कुबलय बिपिन कुंत बन सरिसा । बारिद तपत तेल जनु बरिसा ।।
जे हित रहे करत तेइ पीरा । उरग स्वास सम त्रिबिध समीरा ।।८७।।



कमळांचे समूहही भाल्यांच्या वनाप्रमाणे भासत आहेत. ढग जणू काय उकळते तेल ओतत आहेत असे वाटते. जे हितकर वाटत होते, तेच पीडा देत आहेत. त्रिविध वायु सापाच्या श्वासाप्रमाणे विषारी वाटत आहेत.

**कहेहू तें कछु दुख घटि होई । काहि कहौं यह जान न कोई ।।**
**तत्त्व प्रेम कर मम अरु तोरा । जानत प्रिया एकु मनु मोरा ।।८८।।**

कुणाला सांगण्यानेदेखील दुःख कमी होते, पण सांगू तरी कोणाला ? तुझ्याशिवाय हे दुःख कोणी जाणत नाही. हे प्रिये ! माझ्या व तुझ्या प्रेमतत्त्वाला फक्त एक माझे मनच जाणते.

**सो मनु सदा रहत तोहि पाहीं । जानु प्रीति रसु एतनेहि माहीं ।।**
**प्रभु संदेसु सुनत बैदेही । मगन प्रेम तन सुधि नहिं तेही ।।८९।।**

माझे मन सदैव तुझ्यापाशीच असते. माझ्या प्रेमाचे सार हेच समज.'' प्रभुंचा संदेश

ऐकताच वैदेही म्हणजेच सीता प्रेमविभोर झाली. तिला देहाचीदेखील शुद्ध राहिली नाही.



**कह कपि हृदयँ धीर धरु माता । सुमिरु राम सेवक सुखदाता ।।**
**उर मानहु रघुपति प्रभुताई । सुनि मम बचन तजहु कदराई ।।९०।।**

कपिवर म्हणाले,“हे माते ! धीर धरा व भक्तांना सुख देणाऱ्या श्रीरामांचे स्मरण करा. श्रीरामांचे प्रभुत्व चित्ती स्मरा व माझे सांगणे ऐकून चिन्ता सोडून द्या.

**दोहा - निसिचर निकर पतंग सम रघुपति बान कृसानु।**
**जननी हृदयँ धीर धरु जरे निसाचर जानु ।।९१।।**

राक्षसांचे समूह पतंगाप्रमाणे आहेत व श्रीरामांचे बाण अग्नीप्रमाणे आहेत. आई! सबुरी धर व राक्षस जळून खाक झालेच म्हणून समज.

**जौं रघुबीर होति सुधि पाई । करते नहिं बिलंबु रघुराई ॥**
**राम बान रबि उएँ जानकी । तम बरूथ कहँ जातुधान की ॥९२॥**

जर श्रीरामांना आपला ठावठिकाणा कळला असता तर त्यांनी उशीर केला नसता. हे जानकी ! श्रीरामांच्या बाणरूपी सूर्याच्या उदयानंतर राक्षसी अंधःकाराची सेना कशी राहू शकते ?

**अबहिं मातु मैं जाउँ लवाई । प्रभु आयसु नहिं राम दोहाई ॥**
**कछुक दिवस जननी धरु धीरा । कपिन्ह सहित अइहहिं रघुबीरा ॥९३॥**

हे माते ! मी आपल्याला ह्याच क्षणी घेऊन जाऊ शकतो परंतु रामाची शपथ, रामप्रभुंची मला तशी आज्ञा नाही. आणखी काही दिवस धीर धरा. श्रीराम वानरसेनेसहित येथे येतीलच.



**निसिचर मारि तोहि लै जैहहि। तिहुँ पुर नारदादि जसु गैहहिं ।।**
**हैं सुत कपि सब तुम्हहि समाना । जातुधान अति भट बलवाना ।।९४।।**

आणि राक्षसांना मारून तुम्हाला घेऊन जातील. ते यश नारद इत्यादि मुनी त्रिलोकी गातील.'' सीता म्हणाली, ''हे पुत्रा ! सगळे वानर तुझ्यासारखेच लहानलहान असणार तर राक्षस योद्धे मोठे बलवान आहेत.

**मोरें हृदय परम संदेहा । सुनि कपि प्रगट कीन्हि निज देहा ।।**
**कनक भूधराकार सरीरा । समर भयंकर अतिबल बीरा ।।९५।।**

हीच माझ्या हृदयाला घोर काळजी आहे.'' हे ऐकून मारुतीरायाने आपला मूळ देह प्रकट केला. सोन्याच्या पर्वतासारखे ते शरीर होते, जे रणांगणावर अतिबलवान वीरांना भयदायक होते.

**सीता मन भरोस तब भयऊ । पुनि लघु रूप पवनसुत लयऊ ।।९६।।**



तेव्हा सीतेला खात्री पटली व परत मारुतीने लहान रूप धारण केले.

**दोहा - सुनु माता साखामृग नहिं बल बुद्धि बिसाल ।**
**प्रभु प्रताप तें गरुडहि खाइ परम लघु ब्याल ॥९७॥**

"आई ! ऐक, वानर प्रचंड बलवान व बुद्धिमान नसतात परंतु श्रीरामांच्या प्रतापाने अगदी छोटासा सर्पही गरुडाला खाऊ शकतो.

**मन संतोष सुनत कपि बानी । भगति प्रताप तेज बल सानी ॥**
**आसिष दीन्हि प्रिय राम जाना । होहु तात बल सील निधाना ॥९८॥**

भक्ती, प्रताप, तेज आणि बल ह्यांनी संपन्न अशी हनुमंताची वाणी ऐकून सीतेच्या मनास संतोष झाला. 'हनुमंताला फक्त रामच प्रिय आहे', हे पटल्याने तिने हनुमंताला आशीर्वाद दिला. "हे तात ! तुम्ही बल व शीलाचे धाम व्हाल."



**अजर अमर गुननिधि सुत होहू । करहुँ बहुत रघुनायक छोहू ।।**
**करहुँ कृपा प्रभु अस सुनि काना । निर्भर प्रेम मगन हनुमाना ।।९९।।**

‘‘हे पुत्रा ! तू अजर-अमर आणि गुणांचा खजिना होशील व रघुकुलनायक श्रीरामप्रभु तुझ्यावर प्रेमछत्र धरतील.’’ प्रभु कृपा करतील हे कानाने ऐकून मारुतीराय पूर्ण प्रेमात निमग्न झाले व त्यांचे मन रामाच्या प्रेमाने भरभरून वाहू लागले.

**बार बार नाएसि पद सीसा । बोला बचन जोरि कर कीसा ।।**
**अब कृतकृत्य भयउँ मैं माता । आसिष तब अमोघ बिख्याता ।।१००।।**

मारुतीने सीतेच्या चरणांवर वारंवार मस्तक नमवून व हात जोडून म्हटले, ‘‘माते ! आता मी कृतकृत्य झालो. ही गोष्ट विख्यात आहे की तुझा आशीर्वाद अमोघ आहे.’’

**सुनहु मातु मोहि अतिसय भूखा । लागि देखि सुंदर फल रूखा ।।**
**सुनु सुत करहिं बिपिन रखवारी । परम सुभट रजनीचर भारी ।।१०१।।**





''आई ! मला फार भूक लागली आहे व वृक्षांवर सुंदर फळे लागलेली दिसत आहेत.'' सीता म्हणाली, ''अरे मुला, मोठमोठे योद्धे व अगणित राक्षस ह्या वनाचे रक्षण करतात.''

**तिन्ह कर भय माता मोहि नाही । जौं तुम्ह सुख मानहु मन माहीं ।।१०२।।**

हनुमंत म्हणाला, ''आई ! मला राक्षसांचे भय अजिबात वाटत नाही, मात्र तुमची हरकत नसेल तरच मी फळे खाईन.''

**दोहा- देखि बुद्धि बल निपुन कपि कहेउ जानकीं जाहु ।**
**रघुपति चरन हृदयँ धरि तात मधुर फल खाहु ।।१०३।।**

कपिश्रेष्ठ मारुतीला बुद्धी व बलाने सर्वश्रेष्ठ जाणून जानकी म्हणाली -''हे तात ! रघुनाथांच्या चरणांचे हृदयी स्मरण करून मधुर फळे खा.''

**चलेउ नाइ सिरु पैठेउ बागा । फल खाएसि तरु तोरैं लागा ।।**
**रहे तहाँ बहु भट रखवारे । कछु मारेसि कछु जाइ पुकारे ।।१०४।।**

मारुतीराय सीतामाईंच्या चरणी नतमस्तक होऊन निघाले व फळांच्या बागेत शिरले. त्यांनी फळे खाल्ली व झाडे तोडू लागले. तेथे पुष्कळसे राक्षस योद्धे राखण करत होते. हनुमंताने त्यातील काहीजणांना मारून टाकले व काहीजण ओरडत ओरडत पळू लागले,

**नाथ एक आवा कपि भारी । तेहिं असोक बाटिका उजारी ॥**
**खाएसि फल अरु बिटप उपारे । रच्छक मर्दि मर्दि महि डारे ॥१०५॥**

रावणाकडे जाऊन म्हणाले, ‘‘एक खूप मोठा वानर आला आहे. त्याने अशोकवन उद्ध्वस्त केले आहे. त्याने फळे तर खाल्लीच, वृक्षही उखडून टाकले व पुष्कळशा राक्षसांना मारून मारून जमिनीवर पाडले.’’

**सुनि रावन पठए भट नाना । तिन्हहि देखि गर्जेउ हनुमाना ॥**
**सब रजनीचर कपि संघारे । गए पुकारत कछु अधमारे ॥१०६॥**

असे ऐकताच रावणाने अनेक योद्धे पाठवले. त्या योद्ध्यांना पाहून मारुतीने



गर्जना केली व सर्व राक्षसांना मारून टाकले. त्यातील काही ओरडत ओरडत अर्धमेले होऊन रावणाजवळ गेले.

**पुनि पठयउ तेहिं अच्छकुमारा । चला संग लै सुभट अपारा ।।**
**आवत देखि बिटप गहि तर्जा । ताहि निपाति महाधुनि गर्जा ।।१०७।।**

मग रावणाने आपल्या मुलाला, अक्षयकुमाराला पाठवले. तो अनेक योद्धे बरोबर घेऊन निघाला. त्याला येताना पाहून अंजनीसुताने वृक्ष उखडला व त्याला मारून खूप मोठी गर्जना केली.

**दोहा - कछु मारेसि कछु मर्देसि कछु मिलएसि धरि धूरि ।**
**कछु पुनि जाइ पुकारे प्रभु मर्कट बल भूरि ।।१०८।।**

काही राक्षसांना मारून टाकले, कोणाला तुडवले, कोणाला बदडून धूळ चाखविली. काही राक्षस परत जाऊन ओरडू लागले की हा वानर फार बलवान आहे.



**सुनि सुत बध लंकेस रिसाना । पठएसि मेघनाद बलवाना ।।**
**मारसि जनि सुत बाँधेसु ताही । देखिअ कपिहि कहाँ कर आही ।।१०९।।**

मुलाला मारल्याचे वृत्त ऐकून रावण भयंकर रागावला व त्याने महाबलवान मेघनादाला पाठवले. त्याला म्हणाला की, ‘‘हे मुला, त्या वानराला मारू नकोस, बांधून आण. तो कोण वानर आहे, हे मला पहायचे आहे.’’

**चला इंद्रजित अतुलित जोधा । बंधु निधन सुनि उपजा क्रोधा ।।**
**कपि देखा दारुन भट आवा । कटकटाइ गर्जा अरु धावा ।।११०।।**

इंद्राला जिंकणारा अतुल योद्धा मेघनाद निघाला. भावाला मारलेले ऐकून त्याला फार राग आला. जेव्हा मारुतीने पाहिले की भयंकर योद्धा आला आहे, तेव्हा दात ओठ आवळून गर्जना करत मारुती त्याच्यावर धावून गेला.

**अति बिसाल तरु एक उपारा । बिरथ कीन्ह लंकेस कुमारा ।।**
**रहे महाभट ताके संगा । गहि गहि कपि मर्दइ निज अंगा ।।१११।।**



मारुतीने एक विशाल वृक्ष उपटला व मेघनादाला रथातून पाडले. त्याच्याबरोबर जे मोठमोठे योद्धे होते, त्यांना पकडून आपल्या हातांनीच खूप बदडले.

**तिन्हहि निपाति ताहि सन बाजा । भिरे जुगल मानहुँ गजराजा ॥**
**मुठिका मारि चढा तरु जाई । ताहि एक छन मुरुछा आई ॥११२॥**

त्या सगळ्यांचा संहार करून मारुती परत मेघनादाशी लढू लागला. दोघे असे एकमेकांना भिडले जणू दोन गजराजच ! मेघनादाला एक बुक्का मारून मारुती एका झाडावर चढून बसला. त्यामुळे मेघनादाला क्षणभर मूर्च्छा आली.

**उठि बहोरि कीन्हिसि बहु माया । जीति न जाइ प्रभंजन जाया ॥११३॥**

त्यानंतर उठून इन्द्रजिताने मायावी तंत्राचा प्रयोग केला परंतु तरीही प्रभंजनसुत म्हणजे पवनसुत हनुमंताला तो जिंकू शकला नाही. (प्रभंजन म्हणजे प्रचंड मोठे प्रलयंकारी वादळ.)





दोहा - ब्रह्म अस्त्र तेहि साँधा कपि मन कीन्ह बिचार ।
जौं न ब्रह्मसर मानउँ महिमा मिटइ अपार ।।११४।।

सरतेशेवटी मेघनादाने ब्रह्मास्त्र वापरले. मारुतीने मनात विचार केला की जर मी ब्रह्मास्त्राचा आदर केला नाही तर त्याचा अपार महिमा नाहीसा होईल.

ब्रह्मबान कपि कहुँ तेहिं मारा । परतिहुँ बार कटकु संघारा ।।
तेहिं देखा कपि मुरुछित भयऊ । नागपास बाँधेसि लै गयऊ ।।११५।।

त्याने मारुतीवर ब्रह्मास्त्र सोडले तरीही मारुतीनेदेखील पडता पडताही सेनेचा संहार केला. मेघनादाने पाहिले की वानर मूर्च्छित होऊन पडला आहे. तो कपिवरास नागपाशाने बांधून रावणाकडे घेऊन गेला.

जासु नाम जपि सुनहु भवानी । भव बंधन काटहिं नर ग्यानी ।।
तासु दूत कि बंध तरु आवा । प्रभु कारज लगि कपिहिं बँधावा ।।११६।।

शिव म्हणतात, ‘‘हे भवानी ! ऐक, ज्या श्रीरामांच्या नामाचा जप करून ज्ञानी पुरुष जे सर्वात मोठे बंधन असे भवबंधन, ते तोडून जन्म-मरणातून मुक्त होतात त्यांचा दूत कसा काय बंधनात पडू शकतो?’’ पण श्रीरामांच्या कार्याकरिता हनुमंताने स्वतःला बांधून घेतले.

**कपि बंधन सुनि निसिचर धाए । कौतुक लागि सभाँ सब आए ।।**
**दसमुख सभा दीखि कपि जाई । कहि न जाइ कछु अति प्रभुताई ।।११७।।**

वानराला बांधले गेलेले पाहून सर्व राक्षस कुतूहलाने पळत सभेत आले. मारुतीने रावणाची सभा पाहिली, जिचे ऐश्वर्य सांगता येणार नाही.

**कर जोरें सुर दिसिप बिनीता । भृकुटि बिलोकत सकल सभीता ।।**
**देखि प्रताप न कपि मन संका । जिमि अहिगन महुँ गरुड असंका ।।११८।।**

सर्व दिशांचे अधिपती हात जोडून भयभीत होऊन रावणाच्या भुवयांकडे पाहत होते म्हणजेच ते रावणाचे अंकित होते. त्याचा प्रताप पाहून मारुतीच्या मनात मात्र



मुळीच भीती उत्पन्न झाली नाही. तेथे मारुतीराय म्हणजे जणू सापांमध्ये गरुडच.

**दोहा - कपिहि बिलोकि दसानन बिहसा कहि दुर्बाद ।**
**सुत बध सुरति कीन्हि पुनि उपजा हृदयँ बिषाद ॥११९॥**

हनुमंताला पाहून रावण अर्वाच्य अपशब्द बोलून हसला. पण लगेचच पुत्राच्या मारले जाण्याची आठवण झाल्याने त्याच्या हृदयात विषाद उत्पन्न झाला.

**कह लंकेस कवन तैं कीसा । केहि कें बल घालेहि बन खीसा ॥**
**की धौं श्रवन सुनेहि नहिं मोही । देखउँ अति असंक सठ तोही ॥१२०॥**

रावण म्हणाला, “अरे वानरा, तू कोण आहेस? कोणाच्या जोरावर तू वनाचा विध्वंस केलास? असे वाटते की तू माझे नाव ऐकले नाहीस. अरे शठा, तुला तर अगदी कसलीच भीती नाही.



**मारे निसिचर केहिं अपराधा । कहु सठ तोहि न प्रान कइ बाधा ।।**
**सुनु रावन ब्रह्मांड निकाया । पाइ जासु बल बिरचति माया ।।१२१।।**

तू कोणत्या अपराधाकरता राक्षसांना मारलेस ? काय तुला आपल्या प्राणाचे भय वाटत नाही ?'' हनुमंत म्हणाला, ''हे रावणा ऐक ! ज्यांच्या बळावर माया संपूर्ण विश्वब्रह्मांडांची रचना करते,

**जाकें बल बिरंचि हरि ईसा । पालत सृजत हरत दससीसा ।।**
**जा बल सीस धरत सहसानन । अंडकोस समेत गिरि कानन ।।१२२।।**

ज्यांच्या बळावर ब्रह्मा, विष्णू आणि महेश सृष्टीचे सृजन, पालन व संहार करतात, ज्यांच्या बळावर हजार मुखांचा शेष, पर्वत-वनासहित सर्व ब्रह्मांड धारण करतो,

**धरइ जो बिबिध देह सुरत्राता । तुम्ह से सठन्ह सिखावनु दाता ।।**
**हर कोदंड कठिन जेहिं भंजा । तेहि समेत नृप दल मद गंजा ।।१२३।।**



जे देवतांच्या रक्षणाकरिता नाना प्रकारचे देह धारण करणारे व तुझ्यासारख्या दुष्टांना शिक्षा करणारे असे आहेत, ज्यांनी शिवाचे अभेद्य धनुष्य तोडले व तुझ्यासहित राजांच्या समूहाचा उन्मत्तपणा नष्ट केला,

**खर दूषन त्रिसिरा अरु बाली । बधे सकल अतुलित बलसाली ॥१२४॥**

खर, दूषण, त्रिशिरा व वाली अशा सर्व मोठमोठ्या बलशालींचा वध ज्यांनी केला;

**दोहा - जाके बल लवलेस ते जितेहु चराचर झारि ।**
**तासु दूत मैं जा करि हरि आनेहु प्रिय नारि ॥१२५॥**

ज्यांच्या लेशमात्र बलाने तू सर्व चराचर जगताला जिंकलेस व ज्यांच्या प्रिय पत्नीचे हरण केलेस, त्यांचा मी दूत आहे.

**जानउँ मैं तुम्हारि प्रभुताई । सहसबाहु सन परी लराई ॥**
**समर बालि सन करि जसु पावा । सुनु कपि बचन बिहसि बिहरावा ॥१२६॥**

तुझी बढाई मी जाणतो. सहस्रबाहूशी तुझे युद्ध झाले होते व वालीशी युद्ध करून तुला यश प्राप्त झाले होते.'' मारुतीचे मार्मिक बोलणे ऐकून रावणाने हसून ती गोष्ट टाळली. (येथे मारुतीचे उत्तम दूतत्व



आणि वाक्कौशल्य दिसून येते. वालीबरोबरच्या  युध्दात सपाटून मार खाऊन, रावणाचा पराभव झाला व त्याच वालीचा एका बाणात रामाने वध केला, ह्यातच मारुतीने रामाचे, स्वत:च्या स्वामीचे अतुलनीय सामर्थ्य रावणास दर्शविले व उपहासात्मक मार्मिक वचनांनी रावणाला त्याची जागा दाखवून दिली.)

**खायउँ फल प्रभु लागी भूँखा । कपि सुभाव तें तोरेउँ रूखा ।।**
**सबके देह परम प्रिय स्वामी । मारहिं मोहि कुमारग गामी ।।१२७।।**

''अरे लंकेशा, मला भूक लागली होती म्हणून मी फळे खाल्ली. वानराच्या स्वभावानुसार मी वृक्ष तोडले. हे राक्षसराजा, देह सगळ्यांना प्रिय आहे. कुमार्गगामी राक्षस जेव्हा मला मारू लागले,

**जिन्ह मोहि मारा ते मैं मारे । तेहि पर बाँधेउँ तनयँ तुम्हारे ।।**
**मोहि न कछु बाँधे कइ लाजा । कीन्ह चहउँ निज प्रभु कर काजा ।।१२८।।**

तेव्हा जे मला मारत होते त्यांना मी मारले. त्यावर तुमच्या पुत्राने मला बांधले. मला स्वत:ला बांधून घेण्याची काहीही लाज वाटत नाही. मी माझ्या स्वामींचे कार्य करतो आहे.

**बिनती करउँ जोरि कर रावन । सुनहु मान तजि मोर सिखावन ।।**
**देखहु तुम्ह निज कुलहि बिचारी । भ्रम तजि भजहु भगत भय हारी ।।१२९।।**

हे रावणा, मी हात जोडून तुला विनंती करतो की अभिमान सोडून माझे सांगणे ऐक. तू आपल्या वंशाच्या मर्यादेचा विचार करून पहा व भ्रम सोडून भक्तांचे भय हरण करणाऱ्या रामप्रभुंचे भजन कर.

**जाके डर अति काल डेराई । जो  सुर असुर चराचर खाई ।।**
**तासों बयरु कबहुँ नहिं कीजै । मोरे कहें जानकी दीजै ।।१३०।।**

सुर, असुर, चराचर यांना ग्रासणारा काळही ज्यांना अत्यंत घाबरतो, अशा रामप्रभुंशी तू कधीही वैर करू नकोस व माझ्या सांगण्यावरून जानकीला सन्मानाने परत पाठव.



दोहा - प्रनतपाल रघुनायक करुना सिंधु खरारि ।
गएँ सरन प्रभु राखिहैं तव अपराध बिसारि ।।१३१।।

भक्तांचा प्रतिपाळ करणारे रघुनाथ खरराक्षसाचे शत्रू , करुणेचे सागर आणि शरणागताचे रक्षक आहेत. ते प्रभु , तू त्यांना शरण गेलास तर लगेचच तुझे सर्व अपराध विसरून तुला अभय देतील.

राम चरन पंकज उर धरहू । लंका अचल राजु तुम्ह करहू ।।
रिषि पुलस्ति जसु बिमल मयंका । तेहि ससि महुँ जनि होहु कलंका ।।१३२।।

श्रीरामांच्या चरणकमलांना तू हृदयात धारण कर व लंकेचे अचल राज्य कर. पुलस्त्य ऋषींचे यश निर्मळ चंद्राप्रमाणे आहे. त्या उज्ज्वल वंशरूपी चंद्रावर कलंक होऊ नकोस.

राम नाम बिनु गिरा न सोहा । देखु बिचारि त्यागि मद मोहा ।।
बसन हीन नहिं सोह सुरारि । सब भूषन भूषित बर नारी ।।१३३।।

रामनामाशिवाय वाणी शोभत नाही. मद व मोह सोडून तू हे करून पहा. अरे देवरिपु, सुंदर स्त्री सर्व अलंकारांनी विभूषित असूनसुध्दा वस्त्राशिवाय शोभत नाही.

**राम बिमुख संपति प्रभुताई । जाइ रही पाई बिनु पाई ।।**
**सजल मूल जिन्ह सरितन्ह नाहीं । बरषि गएँ पुनि तबहिं सुखाहीं ।।१३४।।**

तसेच श्रीरामांना विमुख झाल्याने संपत्ती व ऐश्वर्य निघून जात रहाते. ते मिळूनही न मिळाल्यासारखेच आहे. ज्या नद्यांचे पात्र पाण्याने भरलेले नसते म्हणजे स्रोतरहित असते, त्या पावसाळा संपल्यावर परत कोरड्या पडतात.

**सुनु दसकंठ कहउँ पन रोपी । बिमुख राम त्राता नहिं कोपि ।।**
**संकर सहस बिष्नु अज तोही । सकहिं न राखि राम कर द्रोही ।।१३५।।**

अरे रावणा ! ऐक ! मी प्रतिज्ञेने सांगतो की श्रीरामांपासून विमुख राहणाऱ्यांचे रक्षण करणारे कोणीही नाही. हे श्रीरामांशी द्रोह करणाऱ्या दशानना, तुला हजारो शिव, विष्णू व ब्रह्मदेव एकत्र येऊनही वाचवू शकत नाहीत.

**दोहा - मोहमूल बहु सूल प्रद त्यागहु तम अभिमान ।**
**भजहु राम रघुनायक कृपासिंधु भगवान ।।१३६।।**

तो तमरूप अभिमान सोडून दे, जो मोहाचे मूळ आहे व मोह ज्याचे मूळ आहे आणि अत्यंत पीडा देणारा आहे आणि रघुकुलनायक, कृपासिंधु भगवान रामचंद्रांची तू भक्ती कर.''

**जदपि कही कपि अति हित बानी । भगति बिबेक बिरति नय सानी ।।**
**बोला बिहसि महा अभिमानी । मिला हमहि कपि गुर बड ग्यानी ।।१३७।।**

जरी हनुमंताने भक्ती, ज्ञान, वैराग्य व नीतिने भरलेल्या अत्यंत हिताच्या गोष्टी रावणाला सांगितल्या तरी तो अत्यंत अहंकारी रावण हसून म्हणाला, ''अरे वानरा! मला मोठा ज्ञानी गुरुच मिळाला की.''

**मृत्यु निकट आई खल तोही । लागेसि अधम सिखावन मोही ।।**
**उलटा होइहि कह हनुमाना । मतिभ्रम तोर प्रगट मैं जाना ।।१३८।।**

पुढे रावण म्हणाला, ‘‘अरे दुष्टा ! मृत्यू तुझ्याजवळ आला आहे. त्यामुळे तू मला शिकवायला लागला आहेस.’’ तत्क्षणी मारुतीराय म्हणाले,‘‘ ह्याच्या उलट होईल. तुझा मृत्यू जवळ आला आहे कारण आता मला हे कळले आहे की तुला बुद्धिभ्रम झाला आहे.’’



**सुनि कपि बचन बहुत खिसिआना । बेगि न हरहु मूढ कर प्राना ।।**
**सुनत निसाचर मारन धाए । सचिवन्ह सहित बिभीषनु आए ।।१३९।।**

हनुमंताचे बोलणे ऐकून रावण फार रागावला व म्हणाला, ‘‘याला लागलीच का मारून टाकत नाही?’’ हे ऐकताच राक्षस कपिश्रेष्ठास मारायला तुटून पडले व नेमका त्याच वेळेस मंत्र्यासहित बिभीषण तेथे आला.

**नाइ सीस करि बिनय बहूता । नीति बिरोध न मारिअ दूता ।।**
**आन दंड कछु करिअ गोसाँई । सबहीं कहा मंत्र भल भाई ।।१४०।।**

त्याने पुष्कळ विनंती केली, ‘‘दूताला मारणे योग्य नाही. ते नीतिविरुद्ध आहे. हे गोसाई! दुसरी काही शिक्षा करा.’’ सर्व लोक म्हणाले की बिभीषणाचे सांगणे योग्य आहे. (नीतिमर्यादेचे स्मरण करून देण्यास बिभीषण येथे मुद्दाम ‘गोसाई’ असे संबोधतो.)

**सुनत बिहसि बोला दसकंधर । अंग भंग करि पठइअ बंदर ।।१४१।।**

हे ऐकताच रावण हसून म्हणाला, ‘‘या वानराला हात पाय तोडून पाठविले पाहिजे.’’

**दोहा - कपि कें ममता पूँछ पर सबहि कहउँ समुझाइ ।**
**तेल बोरि पट बाँधि पुनि पावक देहु लगाइ ।।१४२।।**



रावणाने सगळ्यांना समजावून सांगितले की, ‘‘वानराचे शेपटीवर फार प्रेम असते. म्हणून तेलात कापड बुडवून ह्याच्या शेपटीला बांधा व मग त्याला आग लावा.

**पूँछहीन बानर तहँ जाइहि । तब सठ निज नाथहि लइ आइहि ।।**
**जिन्ह कै कीन्हिसि बहुत बडाई । देखउँ मै तिन्ह कै प्रभुताई ।।१४३।।**

ज्यावेळी हा वानर बिनशेपटीचा होऊन तेथे जाईल, तेव्हा आपल्या स्वामीला घेऊन येईल. ज्यांची ह्याने इतकी प्रशंसा केली आहे, त्यांचे सामर्थ्य तरी पाहू.’’

**बचन सुनत कपि मन मुसुकाना । भइ सहाय सारद मैं जाना ।।**
**जातुधान सुनि रावन बचना । लागे रचैं मूढ सोइ रचना ।।१४४।।**

रावणाचे बोलणे ऐकून हनुमंत मनातल्या मनात हसला व म्हणाला, ‘‘मला सरस्वती सहायक झाली आहे.’’ (व त्यामुळे रावण रामास आव्हान देऊन बोलावत आहे.)रावणाचे सांगणे ऐकून ते मूर्ख राक्षस त्याप्रमाणे तयारी करू लागले म्हणजे शेपटीला आग लावण्याची व्यवस्था करू लागले.



**रहा न नगर बसन घृत तेला । बाढी पूँछ कीन्ह कपि खेला ।।**
**कौतुक कहँ आए पुरबासी । मारहिं चरन करहिं बहु हाँसी ।।१४५।।**

शेपटीला गुंडाळण्यात इतके तेल व कापड लागले की नगरात वस्त्र, तेल व तूप शिल्लक राहिले नाही कारण मारुतीने लीला केली, त्याची शेपटी वाढत गेली. नगरातील लोक तमाशा पहायला आले. ते मारुतीरायांस लाथा मारत त्यांची थट्टा मस्करी करू लागले. (मारुतीने प्रभुकार्यासाठी हे सर्व आनंदाने सहन केले कारण व्यक्तिगत मानपानाची तमा न बाळगता त्याला सदैव रामकार्याचेच भान आहे.)

**बाजहिं ढोल देहिं सब तारी । नगर फेरि पुनि पूँछ प्रजारी ।।**
**पावक जरत देखि हनुमंता । भयउ परम लघुरूप तुरंता ।।१४६।।**

सर्वजण ढोल वाजवू लागले व टाळ्या पिटू लागले. मारुतीला नगरात फिरवून मग त्याची शेपटी पेटवून दिली. आग लागलेली पाहून मारुतीने लगेच लहान रूप धारण केले.

**निबुकि चढेउ कपि कनक अटारीं । भईं सभीत निसाचर नारीं ।।१४७।।**

साऱ्या बंधनांतून सुटून हनुमान सोन्याच्या गच्च्यांवर चढून गेले. त्यामुळे राक्षसांच्या स्त्रिया भयभीत झाल्या.

**दोहा - हरि प्रेरित तेहि अवसर चले मरुत उनचास ।**
**अट्टहास करि गर्जा कपि बढि लाग अकास ॥१४८॥**

त्यावेळेस प्रभुंच्या प्रेरणेने एकोणपन्नास प्रकारचे वारे वाहू लागले. मारुतीराय हसून गर्जले व वाढता वाढता आकाशाला जाऊन भिडले.

**देह बिसाल परम हरुआई । मंदिर तें मंदिर चढ धाई ॥**
**जरइ नगर भा लोग बिहाला । झपट लपट बहु कोटि कराला ॥१४९॥**



मारुतीचा देह विशाल होता, पण हलका होता. तो एका महालावरुन दुसऱ्या महालावर चढून धावू लागला. लंका जळू लागली. सगळे लोक व्याकूळ झाले. आगीच्या कोट्यवधी ज्वाळा भडकू लागल्या.

**तात मातु हा सुनिअ पुकारा । एहिं अवसर को हमहि उबारा ।।**
**हम जो कहा यह कपि नहिं होई । बानर रूप धरें सुर कोई ।।१५०।।**

"अरे बाप रे, आई गं, ह्यावेळी आम्हाला कोण वाचवेल !" अशी ओरड ऐकू येऊ लागली. "आम्ही तर आधीच सांगितले होते की हा कोणी वानर नसून वानराचे रूप धारण केलेला कुणी देवच आहे."

**साधु अवग्या कर फलु ऐसा । जरइ नगर अनाथ कर जैसा ।।**
**जारा नगरु निमिष एक माही । एक बिभीषन कर गृह नाहीं ।।१५१।।**

सज्जनाचा अनादर केल्याने असेच फळ मिळते. हे नगर अनाथ असल्याप्रमाणे असहायपणे जळते आहे. एका क्षणात नगर जळले. एकट्या बिभीषणाचे घर जळले नाही.

**ताकर दूत अनल जेहिं सिरिजा । जरा न सो तेहि कारन गिरिजा ।।**
**उलटि पलटि लंका सब जारी । कूदि परा पुनि सिंधु मझारी ।।१५२।।**



शिव म्हणतात, ''हे गिरिजे ! ज्यांनी अग्नी निर्माण केला, त्यांचे हनुमंत दूत आहेत. त्यामुळेच ते आगीने जळले नाहीत.'' उलटसुलट सर्व लंका जाळून मग मारुतीने समुद्रात उडी मारली.

**दोहा - पूँछ बुझाइ खोइ श्रम धरि लघु रूप बहोरि ।**
**जनकसुता कें आगें ठाढ भयउ कर जोरि ॥१५३॥**

शेपटी विझवून थकवा दूर झाल्यावर परत लहान रूप धारण करुन हात जोडून जानकीच्या समोर जाऊन उभा राहिला.

**मातु मोहि दीजे कछु चीन्हा । जैसें रघुनायक मोहि दीन्हा ॥**
**चूडामनि उतारि तब दयऊ । हरष समेत पवनसुत लयऊ ॥१५४॥**

ते म्हणाले, ''हे माते ! मला तुमची काही खूण द्या, जशी रघुनाथांनी मला दिली होती.'' तेव्हा जानकीने आपला चूडामणी काढून दिला. मारुतीने अतिशय आनंदाने तो घेतला.



**कहेहु तात अस मोर प्रनामा । सब प्रकार प्रभु पूरनकामा ।।**
**दीन दयाल बिरिदु संभारी । हरहु नाथ मम संकट भारी ।।१५५।।**

सीता म्हणाली, ‘‘हे तात ! प्रभुंना माझा प्रणाम सांगून म्हणा, ‘‘हे प्रभो ! आपण सर्व तऱ्हेने पूर्णकाम आहात. ‘दीनदयाळ’ हे बिरुद राखणाऱ्या नाथा, राघवा ! माझे अत्यंत कठीण संकट दूर करा.’’

**तात सक्रसुत कथा सुनाएहु । बान प्रताप प्रभुहि समुझाएहु ।।**
**मास दिवस महुँ नाथु न आवा । तौ पुनि मोहि जिअत नहिं पावा ।।१५६।।**

‘‘हे तात! तुम्ही इंद्राचा पुत्र जयंताची कथा सांगा व प्रभुंना त्यांच्या स्वत:च्या बाणांच्या प्रतापाचे स्मरण करवून द्या. जर एक महिन्याच्या आत प्रभु आले नाहीत तर मी जिवंत दिसणार नाही.



कहु कपि केहि बिधि राखौं प्राना । तुम्हहू तात कहत अब जाना ।।
तोहि देखि सीतलि भइ छाती । पुनि मो कहुँ सोइ दिनु सो राती ।।१५७।।

कपिवरा ! सांग मी कशा प्रकारे माझे प्राण रोखून ठेवू? तूदेखील आता जायचे म्हणतोस. तुला पाहून माझे हृदय शांत झाले होते. पण आता माझ्यासाठी परत तोच दिवस व तीच रात्र.''

दोहा - जनकसुताहि समुझाइ करि बहु बिधि धीरजु दीन्ह ।
चरनकमल सिरु नाइ कपि गवनु राम पहिं कीन्ह ।।१५८।।

जानकीला समजावून व अनेक प्रकारे धीर देऊन मारुतीने सीतामाईंच्या चरणकमलांवर मस्तक टेकवून श्रीरामांकडे प्रयाण केले.

चलत महाधुनि गर्जेसि भारी । गर्भ स्त्रवहिं सुनि निसिचर नारी ।।
नाघि सिंधु एहि पारहि आवा । सबद किलिकिला कपिन्ह सुनावा ।।१५९।।



मारुतीने निघताना महाध्वनी करून मोठी गर्जना केली. ती ऐकून राक्षसांच्या स्त्रियांचे गर्भपात होऊ लागले. हनुमंत समुद्र ओलांडून ह्या तीरावर आला आणि वानरांना हर्षध्वनी ऐकविला .

**हरषे सब बिलोकि  हनुमाना । नूतन जन्म कपिन्ह तब जाना ।।**
**मुख प्रसन्न तन तेज बिराजा । कीन्हेसि रामचंद्र कर काजा ।।१६०।।**

मारुतीला पाहून सर्वजण प्रसन्न झाले. तेव्हा वानरांनी ओळखले की जणू आपणा सर्वांचा नवीन जन्मच झाला आहे. हनुमंताचे मुख प्रसन्न दिसत होते व शरीरावर तेज विलसत होते. त्यावरून ते समजले की तो श्रीरामांचे कार्य करून आला आहे. (वानरांनी शपथ घेतली होती की सीतामाईंचा शोध लावल्याशिवाय आम्ही जिवंत परतणार नाही व हनुमंत सीतेचा शोध घेऊन आल्यामुळे वानरांना वाटले की हनुमंतानेच जणू आपणा सर्वांना जीवदान दिले.)



**मिले सकल अति भए सुखारी । तलफत मीन पाव जिमि बारी ॥**
**चले हरषि रघुनायक पासा । पूँछत कहत नवल इतिहासा ॥१६१॥**

सर्व वानर मारुतीस भेटून खूप आनंदित झाले. जणू काही तळमळणाऱ्या माशाला पाणी मिळाले. सर्वच्या सर्व हर्षित होऊन नवीन वृत्त विचारत, सांगत, रघुनाथांकडे निघाले.

**तब मधुबन भीतर सब आए । अंगद संमत मधु फल खाए ॥**
**रखवारे जब बरजन लागे । मुष्टि प्रहार हनत सब भागे ॥१६२॥**

तेव्हा सर्व मधुवनात आले व अंगदाच्या संमतीने गोड फळे खाऊ लागले. तेथील रक्षक मनाई करू लागले, तेव्हा वानरांनी ठोसे मारल्यामुळे सर्व रक्षक पळाले.

**दोहा - जाइ पुकारे ते सब बन उजार जुबराज ।**
**सुनि सुग्रीव हरष कपि करि आए प्रभु काज ॥१६३॥**

त्या सगळ्यांनी जाऊन सांगितले की युवराज अंगद मधुवनातील फळे फस्त करत आहेत. हे ऐकून सुग्रीव प्रसन्न झाला की वानर प्रभुंचे कार्य करून आले आहेत.



**जौं न होति सीता सुधि पाई । मधुबन के फल सकहिं कि खाई ॥**
**एहि बिधि मन बिचार कर राजा । आइ गए कपि सहित समाजा ॥१६४॥**

जर ह्यांना सीतेचा शोध लागला नसता तर हे मधुवनातील फळे खाऊ शकले असते का ? अशा प्रकारे राजा सुग्रीव मनात विचार करत असतानाच तो वानरसमूह सुग्रीवाकडे आला.

**आइ सबन्हि नावा पद सीसा । मिलेउ सबन्हि अति प्रेम कपीसा ॥**
**पूँछी कुसल कुसल पद देखी । राम कृपाँ भा काजु बिसेषी ॥१६५॥**

सगळ्यांनी येऊन सुग्रीवाच्या चरणकमलावर मस्तक टेकवले. सुग्रीव सगळ्यांना मोठ्या प्रेमाने भेटला. सुग्रीवाने त्यांना त्यांचे कुशल विचारले. वानर म्हणाले, ‘‘आपल्या चरणांच्या दर्शनाने सर्व कुशल आहे. श्रीरामांच्या कृपेने विशेष कार्य झाले.

**नाथ काजु कीन्हेउ हनुमाना । राखे सकल कपिन्ह के प्राना ॥**
**सुनि सुग्रीव बहुरि तेहि मिलेऊ । कपिन्ह सहित रघुपति पहिं चलेऊ ॥१६६॥**



हे नाथ ! मारुतीनेच सर्व काम केले आहे व वानरांच्या प्राणांचे रक्षण केले आहे.'' हे ऐकून सुग्रीव परत मारुतीला भेटला आणि सगळ्या वानरांना घेऊन श्रीरामांपाशी निघाला.

**राम कपिन्ह जब आवत देखा । किएँ काजु मन हरष बिसेषा ।।**
**फटिक सिला बैठे द्वौ भाई । परे सकल कपि चरनन्हि जाई ।।१६७।।**

जेव्हा श्रीरामांनी वानरांना आपल्याकडे येताना पाहिले तेव्हा त्यांना समजले की कार्य झाले आहे. त्यायोगे ते मनातून प्रसन्न झाले. सगळे वानर स्फटिकशिळेवर बसलेल्या राम व लक्ष्मण दोघांच्या पाया पडले.



**दोहा - प्रीति सहित सब भेटे रघुपति करुना पुंज ।**
**पूँछी कुसल नाथ अब कुसल देखि पद कंज ।।१६८।।**

कारुण्याचे निधी श्रीरघुनाथ प्रेमपूर्वक सगळ्यांना भेटले व त्यांचे कुशल विचारले. ते सर्व म्हणाले, ''हे नाथ ! आपल्या चरणकमलांचे दर्शन झाले म्हणून आम्ही सर्व कुशल आहोत.''

**जामवंत कह सुनु रघुराया । जा पर नाथ करहु तुम्ह दाया ।।**
**ताहि सदा सुभ कुसल निरंतर । सुर नर मुनि प्रसन्न ता ऊपर ।।१६९।।**

जांबुवंत म्हणाला, ''हे श्रीरामा ! ऐका, ज्याच्यावर आपण दया करता त्याच्याकरिता सदैव सर्वकाही शुभ आहे व निरंतर कुशल आहे. देवता, मनुष्य आणि मुनी असे सगळे त्याच्यावर प्रसन्न असतात.

**सोइ बिजई बिनई गुन सागर । तासु सुजसु त्रैलोक उजागर ।।**
**प्रभु कीं कृपा भयउ सबु काजू । जन्म हमार सुफल भा आजू ।।१७०।।**

तोच विजयी, विनयी व गुणांचा समुद्र असतो व अशा त्याचे सुयश तीनही लोकांत प्रसिद्ध होते. प्रभुंच्या कृपेने सगळे कार्य झाले आहे व आमचा जन्म आज सफल झाला आहे.



**नाथ पवनसुत कीन्हि जो करनी । सहसहुँ मुख न जाइ सो बरनी ॥**
**पवनतनय के चरित सुहाए । जामवंत रघुपतिहि सुनाए ॥१७१॥**

हे नाथ ! हनुमंताने जे कार्य केले आहे, त्याचे वर्णन हजारो मुखांनीदेखील करता येणार नाही.'' जांबुवंताने हनुमंताचे सुंदर चरित्र रघुनाथांना सांगितले.

**सुनत कृपानिधि मन अति भाए । पुनि हनुमान हरषि हियँ लाए ॥**
**कहहु तात केहि भाँति जानकी । रहति करति रच्छा स्वप्रान की ॥१७२॥**

हनुमंताचे कार्य श्रीरामांना मनापासून आवडले. मग त्यांनी हर्षित होऊन मारुतीला हृदयाशी धरले. श्रीराम म्हणाले, ''हे तात, सांगा जानकी कशा प्रकारे राहते व कशा प्रकारे आपल्या प्राणांचे रक्षण करते ?''



**दोहा - नाम पाहरू दिवस निसि ध्यान तुम्हार कपाट ।**
**लोचन निज पद जंत्रित जाहिं प्रान केहिं बाट ॥१७३॥**

मारुतीराय म्हणाले, ‘‘आपले नाम रात्रंदिवस पहारा देणारे पहारेदार आहे व आपले ध्यान द्वार आहे. त्या नेत्रांना स्वत:च्या चरणांवर स्थिर ठेवतात, ते कुलूप आहे. मग अशा रीतीने त्यांचे प्राण कुठल्या बरे वाटेने जातील?(सीतामाई रामाशिवाय कोणत्याही परपुरुषाकडे पाहत नाहीत; त्यामुळे त्या डोळे मिटून रामाचे ध्यान करत वा स्वत:च्या चरणांकडे पाहत.)

**चलत मोहि चूडामनि दीन्ही । रघुपति हृदयँ लाइ सोइ लीन्ही ।।**
**नाथ जुगल लोचन भरि बारी । बचन कहे कुछ जनककुमारी ।।१७४।।**

त्यांनी निघताना मला स्वत:चा चूडामणी दिला.’’ श्रीरामांनी तो आपल्या हृदयाशी धरला. मारुती म्हणाला, ‘‘हे नाथ ! अश्रुपूर्ण नयनांनी जानकीने काही निरोप दिला आहे,

**अनुज समेत गहेहु प्रभु चरना । दीन बंधु प्रनतारति हरना ।।**
**मन क्रम बचन चरन अनुरागी । केहिं अपराध नाथ हौं त्यागी ।।१७५।।**

‘लक्ष्मणासह असणाऱ्या श्रीरामप्रभुंचे चरण पकडून सांग की आपण दीनबंधु आहात व शरणागतांचे दुःख दूर करणारे आहात. मन, कर्म व वचनाने श्रीरामचरणांवर माझे प्रेम आहे; मग माझ्या श्रीरामप्रभुंनी कोणत्या अपराधाकरता माझा त्याग केला आहे ?

**अवगुन एक मोर मैं माना । बिछुरत प्रान न कीन्ह पयाना ।।**
**नाथ सो नयनन्हि को अपराधा । निसरत प्रान करहिं हठि बाधा ।।१७६।।**

मला ठाऊक आहे, माझा दोष अवश्य आहे तो हाच की प्रभुंचा वियोग होताच माझे प्राण गेले नाहीत. परंतु हे नाथ ! हा अपराध नेत्रांचा आहे. प्राण जाण्यात हे नेत्र बळजबरीने बाधा आणतात.

**बिरह अगिनि तनु तूल समीरा । स्वास जरइ छन माहिं सरीरा ।।**
**नयन स्रवहिं जलु निज हित लागी । जरैं न पाव देह बिरहागी ।।१७७।।**

विरह हा अग्नी आहे. शरीर कापूस आहे व श्वास वारा आहे. ह्याप्रमाणे हे शरीर



क्षणभरात जळून गेले असते परंतु हे नेत्र रामप्रभुंच्या दर्शनाकरता अश्रूंचा वर्षाव करतात व त्यामुळे हे शरीर विरहाच्या अग्नीने जळून जात नाही.'

**सीता कै अति बिपति बिसाला । बिनहिं कहें भलि दीनदयाला ॥१७८॥**

हे दीनदयाळा ! सीतेची विपत्ती एवढी मोठी आहे की ती सांगवतही नाही, न उच्चारणेच भले.

**दोहा - निमिष निमिष करुनानिधि जाहिं कलप सम बीति ।**
**बेगि चलिअ प्रभु आनिअ भुज बल खल दल जीति ॥१७९॥**

हे करुणानिधान! सीतामाईचा एक एक क्षण एकेका कल्पाप्रमाणे जातो. हे प्रभो, लवकर चला. आपल्या बाहुबलाने दुष्ट दानवदलास जिंकून सीतामाईंना घेऊन या.''

**सुनि सीता दुख प्रभु सुख अयना । भरि आए जल राजिव नयना ॥**
**बचन कायँ मन मम गति जाही । सपनेहुँ बूझिअ बिपति कि ताही ॥१८०॥**



सीतेचे दुःख ऐकून आनंदधाम प्रभुंचे कमलाप्रमाणे असणारे नेत्र पाण्याने भरून आले. ते म्हणाले, ''जिला काया वाचा मने माझीच गती म्हणजे माझा एकमात्र आधार आहे, तिला दुःख होत आहे असे स्वप्नातदेखील वाटते का?''

**कह हनुमंत बिपति प्रभु साई । जब तव सुमिरन भजन न होई ॥**
**केतिक बात प्रभु जातुधान की । रिपुहि जीति आनिबी जानकी ॥१८१॥**

मारुती म्हणाला, ''हे प्रभो ! आपले भजन स्मरण न होणे, हीच तर खरी आपत्ती आहे. तेव्हा त्या जातुधान राक्षसांची काय बिशाद ! म्हणून हे प्रभो ! शत्रूला जिंकून जानकीला घेऊन या.''

**सुनु कपि तोहि समान उपकारी । नहिं कोउ सुर नर मुनि तनुधारी ॥**
**प्रति उपकार करौं का तोरा । सनमुख होइ न सकत मन मोरा ॥१८२॥**

श्रीराम म्हणाले, ''हे हनुमंता ऐक ! तुझ्यासारखा उपकारी देवता, मनुष्य आणि शरीरधारी प्राण्यांत कोणीही नाही. मी तुझ्या ऋणांची परतफेड कशी करू?



माझे मन तुझ्यासमान होऊ शकत नाही .

**सुनु सुत तोहि उरिन मैं नाही । देखेउँ करि बिचार मन माहीं ।।**
**पुनि पुनि कपिहि चितव सुरत्राता । लोचन नीर पुलक अति गाता ।।१८३।।**

हे सुता ! मी मनात विचार केला की मी तुझ्या ऋणातून मुक्त होऊ शकत नाही.'' देवतांचे रक्षक श्रीराम वांरवार हनुमंताकडे पाहू लागले. त्यांचे नेत्र भरून आले व शरीर पुलकित झाले.



**दोहा - सुनि प्रभु बचन बिलोकि मुख गात हरषि हनुमंत ।**
**चरन परेउ प्रेमाकुल त्राहि त्राहि भगवंत ।।१८४।।**

प्रभुंचे बोलणे ऐकून व त्यांचे पुलकित झालेले शरीर पाहून हनुमंत प्रेमाने व्याकूळ होऊन आत्यंतिक कृतज्ञतेने प्रभुंच्या चरणांवर लोळण घेऊन म्हणू लागले, ''हे प्रभो ! माझे रक्षण करा, रक्षण करा.''

**बार बार प्रभु चहइ उठावा । प्रेम मगन तेहि  उठब न भावा ।।**
**प्रभु कर पंकज कपि कें सीसा । सुमिरि सो दसा मगन गौरीसा ।।१८५।।**

प्रभु वारंवार उठवत होते परंतु प्रेमाने विभोर मारुतीरायास तेथून  उठणे आवडेना. श्रीरामांचा करकमल मारुतीरायाच्या शिरावर आहे. अशा स्थितीचे स्मरण होताच शिव तल्लीन झाले.

**सावधान मन करि पुनि संकर । लागे कहन कथा अति सुंदर ।।**
**कपि उठाइ प्रभु हृदयँ लगावा । कर गहि परम निकट बैठावा ।।१८६।।**

मग शिव मनास सावधान करून अत्यंत सुंदर कथा सांगू लागले. मारुतीला उठवून प्रभुंनी हृदयाशी धरले व हात धरून आपल्या अगदी जवळ बसवले.

**कहु कपि रावन पालित लंका । केहि बिधि दहेउ दुर्ग अति बंका ।।**
**प्रभु प्रसन्न जाना हनुमाना । बोला बचन बिगत अभिमाना ।।१८७।।**



त्यांनी विचारले, ‘‘हे हनुमंता ! सांग, रावणाने रक्षण केलेली लंका व तिच्या अत्यंत बिकट किल्ल्याला तू कसे जाळलेस?’’ प्रभुंना प्रसन्न पाहून हनुमंत विनयाने बोलू लागला.

**साखामृग कै बडि मनुसाई । साखा तें साखा पर जाई ॥**
**नाघि सिंधु हाटकपुर जारा । निसिचर गन बधि बिपिन उजारा ॥१८८॥**

‘‘वानराचा सगळ्यात मोठा पुरुषार्थ हाच आहे की तो एका फांदीवरुन दुसऱ्या फांदीवर उडी मारून जातो. समुद्र पार करून मी सोन्याची नगरी जाळली व राक्षसांना मारून बाग उजाड केली;

**सो सब तव प्रताप रघुराई । नाथ न कछु मोरि प्रभुताई ॥१८९॥**

हे रघुनाथा ! सर्वकाही आपल्या प्रतापामुळेच घडले. हे नाथ ! त्यात माझा काहीही मोठेपणा नाही.



**दोहा - ता कहुँ प्रभु कछु अगम नहिं जा पर तुम्ह अनुकूल ।**
**तव प्रभावँ बडवानलहि जारि सकइ खलु तूल ॥१९०॥**

हे प्रभो ! ज्याच्यावर आपली कृपा असेल, त्याच्याकरिता कुठलेही काम अशक्य नाही. आपल्या प्रभावाशिवाय मोठा वणवाही अगदी लहान कापसाससुद्धा जाळू शकत नाही.

**नाथ भगति अति सुखदायनी । देहु कृपा करि अनपायनी ॥**
**सुनि प्रभु परम सरल कपि बानी । एवमस्तु तब कहेउ भवानी ॥१९१॥**

हे नाथ ! कृपा करून मला आत्यंतिक सुखाची प्राप्ती करून देणारी अशी आपली अविनाशी भक्ती द्या.'' शिव म्हणतात, ''हे भवानी, हनुमंताचे अत्यंत निर्व्याज बोलणे ऐकून श्रीराम म्हणाले,''असेच होवो !''

**उमा राम सुभाउ जेहिं जाना । ताहि भजनु तजि भाव न आना ॥**
**यह संबाद जासु उर आवा । रघुपति चरन भगति सोइ पावा ॥१९२ ॥**



हे पार्वती, जो श्रीरामांचा स्वभाव जाणतो, त्याला रामभजन सोडून दुसरी कुठलीही गोष्ट आवडत नाही. हा संवाद ज्याच्या  हृदयात ठसेल, त्यालाच श्रीरामांच्या चरणांची भक्ती प्राप्त होईल.

**सुनि प्रभु बचन कहहिं कपि बृंदा । जय जय जय कृपाल सुखकंदा ।।**
**तब रघुपति कपिपतिहि बोलावा । कहा चलैं कर करहु बनावा ।।१९३।।**

श्रीरामांचे बोलणे ऐकून वानरसमूह म्हणू लागला, ‘‘आनंदकंद कृपाळू श्रीरामांचा विजय असो.’’ तेव्हा श्रीरामांनी सुग्रीवाला बोलावले व म्हणाले, ‘‘ निघण्याची तयारी करूया.

**अब बिलंबु केहि कारन कीजे । तुरत कपिन्ह कहुँ आयसु दीजे ।।**
**कौतुक देखि सुमन बहु बरषी । नभ तें भवन चले सुर हरषी ।।१९४।।**



आता उशीर कशाकरता? तू वानरांना त्वरित आज्ञा दे.'' ही लीला पाहून देवता हर्षाने आकाशातून विपुल पुष्पवर्षाव करून आपापल्या लोकी गेले.

**दोहा - कपिपति बेगि बोलाए आए जूथप जूथ ।**
**नाना बरन अतुल बल बानर भालु बरूथ ।।१९५।।**

सुग्रीवाने तातडीने वानरांना बोलाविले. वानर व अस्वलांचे जथ्थे सेनापतींच्या समूहासह उपस्थित झाले. ते अनेक रंगांचे व अतुल बलवान होते.

**प्रभु पद पंकज नावहिं सीसा । गर्जहिं भालु महाबल कीसा ।।**
**देखी राम सकल कपि सेना । चितइ कृपा करि राजिव नैना ।।१९६।।**

महाबली वानर व अस्वले श्रीरामांच्या चरणकमळांवर मस्तक नमवून गर्जना करू लागतात. श्रीरामांनी सर्व वानरसेनेचे अवलोकन केले व आपल्या राजीवनयनांनी केवळ दृष्टिक्षेपाद्वारे त्यांच्यावर कृपेचा वर्षाव केला.



**राम कृपा बल पाइ कपिंदा । भए पच्छजुत मनहुँ गिरिंदा ।।**
**हरषि राम सब कीन्ह पयाना । सगुन भए सुंदर सुभ नाना ।।१९७।।**

श्रीरामांच्या कृपेचे बल प्राप्त झाल्यावर वानर जणूकाही पंखयुक्त पर्वतच झाले. तेव्हा हर्षित होऊन सर्वांनी श्रीरामांबरोबर प्रयाण केले. निघताना नाना प्रकारचे सुंदर शुभशकुन झाले.

**जासु सकल मंगलमय कीर्ती । तासु पयान सगुन यह नीती ।।**
**प्रभु पयान जाना बैदेहीं । फरकि बाम अँग जनु कहि देहीं ।।१९८।।**

ज्यांची कीर्ती सर्वमंगलमय आहे, त्यांच्या प्रयाणाच्या वेळी शुभशकुन होणे हे नीतिसंगतच आहे. प्रभुंचे प्रस्थान सीतेला कळले. डावे अंग स्फुरण पावून जणूकाही तिला सांगू लागले की श्रीराम येत आहेत.



**जोइ जोइ सगुन जानकिहि होई । असगुन भयउ रावनहि सोई ।।**
**चला कटुक को बरनैं पारा । गर्जहिं बानर भालु अपारा ।।१९९।।**

जानकीला जसजसे शुभशकुन झाले तेच रावणाला अपशकुन झाले. इकडे वानरसेना निघाली. त्यांचे वर्णन कोण करू शकेल? असंख्य वानर, अस्वले गर्जना करू लागले.

**नख आयुध गिरि पादपधारी । चले गगन महि इच्छाचारी ।।**
**केहरिनाद भालु कपि करहीं । डगमगाहिं दिग्गज चिक्करहीं ।।२००।।**

ज्यांची नखेच शस्त्र आहेत असे, जे आपल्या इच्छेनुसार कोठेही गमन करू शकणारे, पर्वत तसेच वृक्ष शस्त्र म्हणून वापरणारे,आकाशमार्गाने उड्डाण करणारे असे ते विविध प्रकारचे वीरसैनिक निघाले. वानर, अस्वले सिंहनाद करू लागले आणि दिशांचे हत्ती विचलित होऊन म्हणजे डगमगून चित्कार करू लागले.



छंद- चिक्करहिं दिग्गज डोल महि गिरि लोल सागर खरभरे
मन हरष सभ गंधर्ब सुर मुनि नाग किंनर दुख टरे ।
कटकटहिं मर्कट बिकट भट बहु कोटि कोटिन्ह धावहीं
जय राम प्रबल प्रताप कोसलनाथ गुन गन गावहीं ॥२०१॥

सर्व दिशांचे रक्षक असणारे हत्तीच डगमगून ओरडू लागल्यामुळे पृथ्वी डोलू लागली, पर्वत कापू लागले व समुद्र खवळला. सूर्य, चंद्र, देवता, मुनी, नाग, किन्नर इत्यादि मनात प्रसन्न झाले की आता दुःख संपत आले. कित्येक कोटी वानर जे भयानक योद्धे आहेत, ते दात ओठ खात धावत होते. प्रबल, प्रतापी, कोसलाधीश श्रीरामांचे गुण गात; ते म्हणत आहेत की श्रीरामांचा जय होवो.

सहि सक न भार उदार अहिपति बार बारहिं मोहई
गह दसन पुनि पुनि कमठ पृष्ठ कठोर सो किमि सोहई ।
रघुबीर रुचिर प्रयान प्रस्थिति जानि परम सुहावनी
जनु कमठ खर्पर सर्पराज सो लिखत अबिचल पावनी ॥२०२॥



उदार शेष जणू त्या सेनेचा भार सहन करू शकत नाही व वारंवार मोहित होतो. तो कासवाच्या कठीण पाठीवर का बरे परत परत दंश करत आहे ? कारण हेच की रघुवीर श्रीरामांच्या प्रस्थानसमयीची ती अतिशय सुंदर परिस्थिती पाहून तिचे पवित्र वर्णन तो अविचल श्रीशेष कासवाच्या पाठीवर लिहू लागला.

**दोहा - एहि बिधि जाइ कृपानिधि उतरे सागर तीर ।**
**जहँ तहँ लागे खान फल भालु बिपुल कपि बीर ।।२०३।।**

ह्याप्रमाणे कृपेचे सागर श्रीराम जाऊन समुद्र किनाऱ्यावर उतरले. अनेक अस्वले व वानरवीर आसपासची फळे खाऊ लागले.

**उहाँ निसाचर रहहिं ससंका । जब तें जारि गयउ कपि लंका ।।**
**निज निज गृहँ सब करहिं बिचारा । नहिं निसिचर कुल केर उबारा ।।२०४।।**

मारुतीराय लंका जाळून गेल्यापासून राक्षस साशंक राहू लागले होते.



सर्वजण घरी विचार करत होते की आता राक्षसवंशाचे कल्याण होणार नाही.

**जासु दूत बल बरनि न जाई । तेहि आएँ पुर कवन भलाई ॥**
**दूतिन्ह सन सुनि पुरजन बानी । मंदोदरी अधिक अकुलानी ॥२०५॥**

ज्याच्या दूताच्या बळाचे वर्णन करता येणार नाही, त्याच्या येण्याने लंकेचे भले कसे होणार? दूतींकडून लंकावासीयांच्या गोष्टी ऐकून मंदोदरी अतिशय व्याकूळ झाली.

**रहसि जोरि कर पति पग लागी । बोली बचन नीतिरस पागी ॥**
**कंत करष हरि सन परिहरहू । मोर कहा अति हित हियँ धरहू ॥२०६॥**

ती एकांतात हात जोडून पतीच्या पाया पडली व नीतिरसाने भरलेल्या वाणीने म्हणाली, ''हे स्वामी ! रामप्रभुंना विरोध करणे सोडा व अत्यंत हितकर असे माझे सांगणे अंतरंगी धारण करा.

**समुझत जासु दूत कइ करनी । स्रवहिं गर्भ रजनीचर घरनी ।।**
**तासु नारि निज सचिव बोलाई । पठवहु कंत जो चहहु भलाई ।।२०७।।**

जर तुम्हाला स्वत:चे व राज्याचे हित करावयाचे असेल तर ज्या प्रभुंच्या दूताचा पराक्रम स्मरताच राक्षसींचे गर्भ गळून पडतात, अशा त्या रामप्रभुंच्या पत्नीला बोलावून आपल्या मंत्र्याबरोबर त्यांच्याकडे पाठवून द्या.

**तव कुल कमल बिपिन दुखदाई । सीता सीत निसा सम आई ।।**
**सुनहु नाथ सीता बिनु दीन्हें । हित न तुम्हार संभु अज कीन्हें ।।२०८।।**

तुमच्या कुलरूपी-कमलाच्या वनाला दुःख देणाऱ्या शीत ऋतुतील रात्रीप्रमाणे सीता आली आहे. हे नाथ ! ऐका, सीतेला परत पाठविल्याविना शिव व ब्रह्मा तुम्हाला सहाय्य करणारच नाहीत.



**दोहा - राम बान अहि गन सरिस निकर निसाचर भेक ।**
**जब लगि ग्रसत न तब लगि जतनु करहु तजि टेक ॥२०९॥**

श्रीरामांचे बाण सर्पांच्या समूहाप्रमाणे आहेत व राक्षस क्षुल्लक बेडकांप्रमाणे. जोवर ते ग्रासत नाहीत, तोवर त्यांनी ग्रासण्याच्या आधी हटवादीपणा सोडून स्वत:चे रक्षण करून घ्या.''

**श्रवन सुनी सठ ता करि बानी । बिहसा जगत बिदित अभिमानी ॥**
**सभय सुभाउ नारि कर साचा । मंगल महुँ भय मन अति काचा ॥२१०॥**

मंदोदरीचे सांगणे त्या अहंकारी रावणाने ऐकले व हसून म्हणाला, ‘‘ स्त्रियांचा स्वभाव भित्रा असतो हे खरेच आहे. मंगलकार्याच्या वेळेससुद्धा त्या भीती बाळगतात कारण त्यांचे मन अतिशय कमकुवत असते.

**जौं आवइ मर्कट कटकाई । जिअहिं बिचारे निसिचर खाई ॥**
**कंपहिं लोकप जाकीं त्रासा । तासु नारि सभीत बड़ि हासा ॥२११॥**

जर वानरांची सेना आली तर राक्षस त्या बिचाऱ्यांना खाऊन जगतील. ज्याच्या भयाने लोकपालदेखील कापतात त्याची पत्नी भित्री आहे, ही किती लाज वाटण्यासारखी गोष्ट आहे. ''

**अस कहि बिहसि ताहि उर लाई । चलेउ सभाँ ममता अधिकाई ।।**
**मंदोदरी हृदयँ कर चिंता । भयउ कंत पर बिधि बिपरीता ।।२१२।।**

रावणाने असे म्हणून हसत मंदोदरीला आपल्या हृदयाशी धरले व अधिकच ममता दाखवून तो सभेत निघून गेला. मंदोदरी मनात चिंता करू लागली की विधाता आपल्या पतीच्या विरुद्ध झाला आहे.

**बैठेउ सभाँ खबरि असि पाई । सिंधु पार सेना सब आई ।।**
**बूझेसि सचिव उचित मत कहहू । ते सब हँसे मष्ट करि रहहू ।।२१३।।**

तो सभेत जाऊन बसला. त्याला असे कळले की सगळी वानरसेना समुद्राच्या

पलीकडच्या तीरावर आली आहे. त्याने मंत्र्यांना विचारले की तुम्ही योग्य तो सल्ला द्या. मंत्रिगण हसले व म्हणाले, ‘‘बेफिकीरपणे आरामात रहावे.



**जितेहु सुरासुर तब श्रम नाहीं । नर बानर केहि लेखे माहीं ।।२१४।।**

ज्यावेळी तुम्ही देवतांना व राक्षसांना जिंकलेत तेव्हा काही श्रम पडले नाहीत, मग मनुष्य व वानरांची काय कथा ? ’’

**दोहा - सचिव बैद गुरु तीनि जौं प्रिय बोलहिं भय आस ।**
**राज धर्म तन तीनि कर होई बेगिहीं नास ।।२१५।।**

जेव्हा मंत्री, वैद्य व गुरु हे भीतीने वा लाभाच्या आशेने खुशामत करतात; तेव्हा राज्य, धर्म आणि देह या तीनही तत्त्वांचा लवकरच नाश होतो.

**सोइ रावन कहुँ बनी सहाई । अस्तुति करहिं सुनाइ सुनाई ॥**
**अवसर जानि बिभीषनु आवा । भ्राता चरन सीसु तेहिं नावा ॥२१६॥**

तेच रावणाबाबत झाले. मंत्रिगण त्याची खोटी, वृथा स्तुती करत होते. हीच योग्य वेळ आहे हे ओळखून बिभीषण आला व भाऊ रावणाच्या पाया पडला.

**पुनि सिरु नाइ बैठ निज आसन । बोला बचन पाइ अनुसासन ॥**
**जौ कृपाल पूँछिहु मोहि बाता । मति अनुरूप कहउँ हित ताता ॥२१७॥**

नंतर पाया पडून बिभीषण आपल्या स्थानावर बसला व रावणाची आज्ञा घेऊन म्हणाला, ‘‘हे कृपाळू ! जर तुम्ही मला सल्ला विचारला आहे तर हे तात ! मी माझ्या बुद्धीनुसार आपल्या हिताची गोष्ट सांगतो.

**जो आपन चाहै कल्याना । सुजसु सुमति सुभ गति सुख नाना ॥**
**सो परनारि लिलार गोसाईं । तजउ चउथि के चंद कि नाईं ॥२१८॥**



जर तुम्हाला स्वतःचे कल्याण, सुयश, उत्तम मनःशक्ती, शुभगती आणि नानाविध प्रकारची सुखे हवी असतील तर हे श्रेष्ठ पुरुषा, तुला परस्त्रीचे ललाट भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या ( गणेशचतुर्थीच्या ) चंद्राप्रमाणे त्यागले पाहिजे.

**चौदह भुवन एक पति होई । भूत द्रोह तिष्टइ नहिं सोई ।।**
**गुन सागर नागर नर जोऊ । अलप लोभ भल कहइ न कोऊ ।।२१९।।**

जरी चौदा भुवनांचा एकमेव स्वामी असला तरी तोसुद्धा भूतमात्रांशी द्रोह करून टिकू शकत नाही. मनुष्य जरी गुणांचा समुद्र असला, चतुर असला; पण त्याच्यात थोडा जरी लोभ असेल तर तो चांगला म्हणविला जात नाही.

**दोहा - काम क्रोध मद लोभ सब नाथ नरक के पंथ ।**
**सब परिहरि रघुबीरहि भजहु भजहिं जेहि संत ।।२२०।।**

हे नाथ! काम, क्रोध, मद आणि लोभ हे सर्व नरकाचे मार्ग आहेत म्हणून हे सर्व मार्ग सोडून, ज्यांना संत भजतात त्या श्रीरामांची भक्ती करा.



**तात राम नहिं नर भूपाला । भुवनेस्वर कालहु कर काला ।।**
**ब्रह्म अनामय अज भगवंता । ब्यापक अजित अनादि अनंता ।।२२१।।**

ज्येष्ठ भ्राता ! रामचंद्र केवळ मनुष्यांचे राजे नाहीत. ते सर्व विश्वाचे ईश्वर व काळाचेही काळ आहेत. ते साक्षात अनामय ब्रह्म, अजन्मा भगवान आहेत. ते सर्वव्यापक, अजय, अनादि आणि अनंत आहेत.

**गो द्विज धेनु देव हितकारी । कृपासिंधु मानुष तनुधारी ।।**
**जन रंजन भंजन खल ब्राता । बेद धर्म रच्छक सुनु भ्राता ।।२२२।।**

ते पृथ्वी, गायत्रीचे उपासक, गाय आणि देवतांचे हित करणारे कृपेचे सागर, दुष्टांच्या समूहाला नष्ट करणारे, तसेच वैदिक धर्मरक्षक, मनुष्यशरीर धारण करणारे, भक्ताला आनंद देणारे आहेत.



ताहि बयरु तजि नाइअ माथा । प्रनतारति भंजन रघुनाथा ।।
देहु नाथ प्रभु कहुँ बैदेही । भजहु राम बिनु हेतु सनेही ।।२२३।।

शत्रुत्व सोडून त्यांच्यापुढे मस्तक नमवा. श्रीराम शरणागतांचे दुःख हरण करणारे आहेत. हे नाथ ! वैदेहीला (सीतेला) रामप्रभुंकडे परत पाठवा व लाभावीण प्रेम करणाऱ्या प्रभु श्रीरामांना भजा.

सरन गएँ प्रभु ताहु न त्यागा । बिस्व द्रोह कृत अघ जेहि लागा ।।
जासु नाम त्रय ताप नसावन । सोइ प्रभु प्रगट समुझु जियँ रावन ।।२२४।।

ज्याला विश्वद्रोह करण्याचे पातक लागले असेल, तोदेखील जर शरण आला तर प्रभु त्याला त्यागत नाहीत, त्याचे रक्षणच करतात. हे रावणा, ज्यांचे नाम तीनही तापांचे नाश करणारे आहे, तेच प्रभु प्रकट झाले आहेत, हे लक्षात घे.

दोहा - बार बार पद लागउँ बिनय करउँ दससीस ।
परिहरि मान मोह मद भजहु कोसलाधीस ।।२२५।।



हे दशानना रावणा, मी वारंवार आपल्या पाया पडतो व विनंती करतो की मान, मोह, मद ह्यांचा त्याग करून श्रीरामांना भजा.

**मुनि पुलस्ति निज सिष्य सन कहि पठई यह बात ।**
**तुरत सो मैं प्रभु सन कही पाइ सुअवसरु तात ॥२२६॥**

पुलस्त्य मुनींनी आपल्या शिष्यांबरोबर हाच निरोप पाठवला आहे. हे तात ! सुसमय पाहून मी तो लागलीच आपल्या कानावर घातला.''

**माल्यवंत अति सचिव सयाना । तासु बचन सुनि अति सुख माना ॥**
**तात अनुज तव नीति बिभूषन । सो उर धरहु जो कहत बिभीषन ॥२२७॥**

अत्यंत बुद्धिमान मंत्री माल्यवानाला बिभीषणाचे सांगणे ऐकून बरे वाटले. तो म्हणाला, ''हे तात! आपले धाकटे भाऊ बिभीषण नीतिचे विभूषणरूप आहेत म्हणून जे काही बिभीषण सांगत आहेत, ते आपल्या अंतरंगात धारण करा.''



**रिपु उतकरष कहत सठ दोऊ । दूरि न करहु इहाँ हइ कोऊ ॥**
**माल्यवंत गृह गयउ बहोरी । कहइ बिभीषनु पुनि कर जोरी ॥२२८॥**

रावण म्हणाला, ‘‘हे दोघे दांभिक, शत्रूचा मोठेपणा वर्णन करून सांगत आहेत. कोणी आहे का इथे? यांना दूर करा.’’ मग माल्यवान घरी निघून गेला परंतु बिभीषण पुन्हा हात जोडून म्हणू लागला,

**सुमति कुमति सब के उर रहहीं । नाथ पुरान निगम अस कहहीं ॥**
**जहाँ सुमति तहँ संपति नाना । जहाँ कुमति तहँ बिपति निदाना ॥२२९॥**

‘‘हे नाथ ! सुमती आणि कुमती ह्या दोन्ही सर्वांच्या अंतरंगात असतात, असे पुराण व वेद सांगतात. जेथे सुमती असते, तेथे नाना प्रकारची संपदा असते; अर्थातच जेथे कुमती असते, तीच सर्व विपत्तींचे कारण ठरते.



तव उर कुमति बसी बिपरीता । हित अनहित मानहु रिपु प्रीता ।।
कालराति निसिचर कुल केरी । तेहि सीता पर प्रीति घनेरी ।।२३०।।

आपल्या हृदयात विपरीत अशी कुमतीच वास करते आहे. त्यामुळे आपण हिताला अहित व शत्रूला मित्र मानत आहात. ज्या सीतेला येथे ठेवणे राक्षसांच्या वंशाकरता काळरात्रीप्रमाणे आहे, त्याच सीतेवर आपले फार प्रेम आहे.

दोहा - तात चरन गहि मागउँ राखहु मोर दुलार ।
सीता देहु राम कहुँ अहित न होइ तुम्हार ।।२३१।।

ज्येष्ठ बंधो, मी आपले पाय धरून भीक मागतो, आपण माझे म्हणणे ऐका. श्रीरामांना सीता परत करा; ज्यायोगे आपले अहित होण्याचे टळेल.''

बुध पुरान श्रुति संमत बानी । कही बिभीषन नीति बखानी ।।
सुनत दसानन उठा रिसाई । खल तोहि निकट मृत्यु अब आई ।।२३२।।



बिभीषणाने जी नीति वर्णन करून सांगितली ती विद्वानांना, पुराणांना व वेदांना संमत वाणी आहे. ती ऐकून रावण क्रोधाने पेटून उठला व म्हणाला, “अरे दुष्टा! तुझे मरण जवळ आले आहे.

**जिअसि सदा सठ मोर जिआवा । रिपु कर पच्छ मूढ़ तोहि भावा ।।**
**कहसि न खल अस को जग माहीं । भुज बल जाहि जिता मैं नाहीं ।।२३३।।**

अरे शठा ! तू सदैव माझ्या जीवावर जगत आहेस व माझ्या अन्नावर पोसला जात आहेस. परंतु अरे मूर्खा ! शत्रुचाच पक्ष तुला चांगला वाटतो. अरे दुष्टा, तू सांगत का नाहीस की जगात असा कोण आहे ज्याला मी माझ्या बाहुबळावर जिंकले नाही ?

**मम पुर बसि तपसिन्ह पर प्रीती । सठ मिलु जाई तिन्हहि कहु नीति ।।**
**अस कहि कीन्हेसि चरन प्रहारा । अनुज गहे पद बारहिं बारा ।।२३४।।**

माझ्या नगरात राहून तू त्या तपस्व्यांवर प्रेम करतोस. तू त्यांच्या पायाशीच जा व त्यांनाच नीतिचा उपदेश सांग. ”

असे म्हणून रावणाने लाथ मारली परंतु लाथ मारल्यानंतरदेखील धाकटा भाऊ बिभीषण ह्याने पाय धरून वारंवार विनंती केली.

**उमा संत कइ इहइ बड़ाई । मंद करत जो करइ भलाई ॥**
**तुम्ह पितु सरिस भलेहिं मोहि मारा । रामु भजें हित नाथ तुम्हारा ॥२३५॥**

शिव म्हणतात, “हे उमे ! संतांची हीच थोरवी आहे की ते वाईट करणाऱ्याचेही चांगलेच करतात.” बिभीषण म्हणाले, “हे नाथ ! तुम्ही पित्यासमान आहात, त्यामुळे तुम्ही मला मारल्यास काहीच हरकत नाही परंतु श्रीरामांची भक्ती करण्यातच तुमचे कल्याण आहे.”

**सचिव संग लै नभ पथ गयऊ । सबहि सुनाइ कहत अस भयऊ ॥२३६॥**

त्यानंतर बिभीषण आपल्या मंत्र्यांना बरोबर घेऊन आकाशमार्गाने गेला व सर्व लोकांना ऐकू जाईल असे मोठ्याने बोलला,





दोहा - रामु सत्यसंकल्प प्रभु सभा कालबस तोरि ।
मैं रघुबीर सरन अब जाउँ देहु जनि खोरि ।।२३७।।

"हे रावणा ! श्रीराम सत्यसंकल्प प्रभु आहेत व तुझी सभा काळाने ग्रासलेली आहे. मी आता श्रीरामांना शरण जातो, मला दोष देऊ नकोस."

अस कहि चला बिभीषनु जबहीं । आयू हीन भए सब तबहीं ।।
साधु अवग्या तुरत भवानी । कर कल्यान अखिल कै हानी ।।२३८।।

असे म्हणून बिभीषण जेव्हा निघाला, तेव्हा राक्षसांचे आयुष्य समाप्त झाले. शिव म्हणतात," उमे ! सज्जनांचा अनादर लगेचच सर्व कल्याणाचा नाश करतो."

रावन जबहिं बिभीषन त्यागा । भयउ बिभव बिनु तबहिं अभागा ।।
चलेउ हरषि रघुनायक पाहीं । करत मनोरथ बहु मन माहीं ।।२३९।।

जेव्हा बिभीषणाने रावणाचा त्याग केला तेव्हाच रावण अभागी, वैभवहीन झाला. बिभीषण प्रसन्न होऊन, अनेकविध मनोरथे करत श्रीरामांकडे निघाला.

**देखिहउँ जाइ चरन जलजाता । अरुन मृदुल सेवक सुखदाता ॥**
**जे पद परसि तरी रिषिनारी । दंडक कानन पावनकारी ॥२४०॥**

बिभीषणाने विचार केला की मी जाऊन प्रभुंच्या आरक्त व कोमल, तसेच भक्तांना आनंद देणाऱ्या चरणकमलांचे दर्शन घेईन. ज्या चरणांच्या स्पर्शाने अहल्या तरून गेली व ज्या चरणांनी दंडकारण्य पवित्र केले आहे,

**जे पद जनकसुताँ उर लाए । कपट कुरंग संग धर धाए ॥**
**हर उर सर सरोज पद जेई । अहोभाग्य मैं देखिहउँ तेई ॥२४१॥**

ज्या चरणांना सीतेने हृदयात धारण केले आहे, जे चरण कपटी मृगापाठी त्याला धरावयास धावले होते, जे चरण शिवांच्या हृदयरूपी सरोवरातील कमळे आहेत,



माझे अहोभाग्य आहे की मी त्या चरणांचे दर्शन घेईन.

**दोहा - जिन्ह पायन्ह के पादुकन्हि भरतु रहे मन लाइ ।**
**ते पद आजु बिलोकिहउँ इन्ह नयनन्हि अब जाइ ॥२४२॥**

ज्या चरणांच्या पादुकांमध्ये भरताचे मन जडले आहे, त्या चरणांना मी माझ्या डोळ्यांनी पाहीन.

**एहि बिधि करत सप्रेम बिचारा । आयउ सपदि सिंधु एहिं पारा ॥**
**कपिन्ह बिभीषनु आवत देखा । जाना कोउ रिपु दूत बिसेषा ॥२४३॥**

अत्यंत प्रेमाने असा विचार करत करत बिभीषण जलद वेगाने समुद्राच्या ह्या किनारी आला. वानरांनी बिभीषणाला येताना पाहिले. त्यांनी ओळखले की हा शत्रूचा कोणी विशेष दूत आहे.



**ताहि राखि कपीस पहिं आए । समाचार सब ताहि सुनाए ।।**
**कह सुग्रीव सुनहु रघुराई । आवा मिलन दसानन भाई ।।२४४।।**

बिभीषणाला तेथेच थांबवून वानर सुग्रीवापाशी आले व त्याला सर्व हकिकत सांगितली. सुग्रीव रामाकडे जाऊन म्हणाला, ‘‘हे रघुराया ! रावणाचा भाऊ आपल्याला भेटावयास आला आहे.’’

**कह प्रभु सखा बूझिए काहा । कहइ कपीस सुनहु नरनाहा ।।**
**जानि न जाइ निसाचर माया । कामरूप केहि कारन आया ।।२४५।।**

प्रभु म्हणाले, ‘‘हे मित्रा, त्यांच्या येण्याचा अर्थ काय समजायचा ?’’ सुग्रीव म्हणाला, ‘‘हे राजा ! राक्षसांची माया समजत नाही. इच्छेप्रमाणे रूप बदलणारा राक्षस कशासाठी आला आहे, हे कळत नाही.



**भेद हमार लेन सठ आवा । राखिअ बाँधि मोहि अस भावा ।।**
**सखा नीति तुम्ह नीकि बिचारी । मम पन सरनागत भयहारी ।।२४६।।**

हा दुष्ट आमचे रहस्य जाणण्यासाठी आला आहे म्हणून मला असे वाटते की ह्याला बांधून ठेवावे.'' श्रीराम म्हणाले, ''हे मित्रा, तू रणनीति तर चांगली सांगितलीस परंतु माझे ब्रीदच शरणागताचे भयहरण करणे, हे आहे.''

**सुनि प्रभु बचन हरष हनुमाना । सरनागत बच्छल भगवाना ।।२४७।।**

हे प्रभुंचे बोलणे ऐकून हनुमंताला आत्यंतिक आनंद झाला. हनुमंत मनातल्या मनात म्हणाला, '' माझे श्रीरामप्रभु शरणागतवत्सल आहेत.''

**दोहा - सरनागत कहुँ जे तजहिं निज अनहित अनुमानि ।**
**ते नर पावँर पापमय तिन्हहि बिलोकत हानि ।।२४८।।**

‘‘जे लोक आपले अहित होईल म्हणून शरणागताचा त्याग करतात, ते पापाचे वाटेकरी होतात आणि त्यांच्या दर्शनानेही हानी होते.

**कोटि बिप्र बध लागहिं जाहू । आएँ सरन तजउँ नहिं ताहू ।।**
**सनमुख होइ जीव मोहि जबहीं । जन्म कोटि अघ नासहिं तबहीं ।।२४९।।**

ज्याने कोट्यवधी गायत्री उपासकांची हत्या केली आहे, असा जरी शरण आला तरी मी त्याचा त्याग करत नाही. जो जीव माझ्या सन्मुख येतो, त्याची कोट्यवधी जन्मांतील पापे नष्ट होतात.

**पापवंत कर सहज सुभाऊ । भजनु मोर तेहि भाव न काऊ ।।**
**जौं पै दुष्ट हृदय सोइ होई । मोरें सनमुख आव कि सोई ।।२५०।।**

पापी व्यक्तीचा हा सहज स्वभाव आहे की त्याला माझे भजन कधीच आवडत नाही. जर तो रावणाचा भाऊ दुष्ट हृदयाचाअसला तर तो माझ्यासमोर भेटीसाठी कधीतरी येऊ शकेल का?



**निर्मल मन जन सो मोहि पावा । मोहि कपट छल छिद्र न भावा ।।**
**भेद लेन पठवा दससीसा । तबहुँ न कछु भय हानि कपीसा ।।२५१।।**

निर्मळ अंतरंग असणाऱ्यास मी पावतो. मला कपट, लबाडी,अनीति आवडत नाही. रावणाने त्याला जरी रहस्य समजून घेण्यासाठी पाठवले असले तरी हे सुग्रीवा, काही भय वा हानी नाही.

**जग महुँ सखा निसाचर जेते । लछिमनु हनइ निमिष महुँ तेते ।।**
**जौं सभीत आवा सरनाईं । रखिहउँ ताहि प्रान की नाईं ।।२५२।।**

मित्रा ! जगात जेवढे राक्षस आहेत त्या सगळ्यांना लक्ष्मण एका क्षणात मारू शकतो. जर रावणाचा भाऊ भयभीत होऊन मला शरण आला असेल तर त्याला मी स्वतःच्या प्राणासमान जपेन.''



**दोहा - उभय भाँति तेहि आनहु हँसि कह कृपानिकेत ।**
**जय कृपाल कहि कपि चले अंगद हनू समेत ॥२५३॥**

कृपाधाम श्रीराम हसून म्हणाले, “त्याच्या मनात दोहोंपैकी काहीही असेल म्हणजेच लबाडी असेल वा खरेच शारण्यभाव असेल तरीही त्याला सन्मानाने घेऊन या.” अंगद व हनुमानासहित वानर, ‘कृपाळू श्रीरामांचा जय होवो’, असे म्हणत बिभीषणास आणण्यास निघाले.

**सादर तेहि आगें करि बानर । चले जहाँ रघुपति करुनाकर ॥**
**दूरिहि ते देखे द्वौ भ्राता । नयनानंद दान के दाता ॥२५४॥**

बिभीषणाला सादर सन्मानाने पुढे ठेवून सर्व वानर तेथे निघाले, जेथे करुणाकर श्रीराम होते. नेत्रांना आनंद देणाऱ्या दोघा भावांना (रामलक्ष्मणांना) बिभीषणाने दूरूनच पाहिले.



**बहुरि राम छबिधाम बिलोकी । रहेउ ठटुकि एकटक पल रोकी ।।**
**भुज प्रलंब कंजारुन लोचन । स्यामल गात प्रनत भय मोचन ।।२५५।।**

सौंदर्यधाम श्रीरामांना पाहून बिभीषण पापणी न हलवता स्तब्ध होऊन एकटक पाहत राहिला. श्रीरामांचे विशाल बाहू, लाल कमळाप्रमाणे विकसित असणारे नेत्र बिभीषण पाहत होता. शरणागतांचे भय दूर करणारे, सावळी काया असणारे माझे प्रभु किती सुंदर आहेत !

**सिंघ कंध आयत उर सोहा । आनन अमित मदन मन मोहा ।।**
**नयन नीर पुलकित अति गाता । मन धरि धीर कही मृदु बाता ।।२५६।।**

रामरायाचे सिंहाप्रमाणे असणारे खांदे व रुंद छाती शोभत आहेत. त्यांचे मुख असंख्य कामदेवांच्या मनाला मोह पाडणारे आहे. प्रभुंचे सुंदर मनोहर स्वरूप पाहून बिभीषणाचे नेत्र प्रेमाश्रुमय झाले, शरीर अत्यंत पुलकित झाले. त्याने मनात धीर करून हळुवार शब्दांत म्हटले,



**नाथ दसानन कर मैं भ्राता । निसिचर बंस जनम सुरत्राता ।।**
**सहज पापप्रिय तामस देहा । जथा उलूकहि तम पर नेहा ।।२५७।।**

‘‘हे नाथ ! मी रावणाचा भाऊ आहे. देवांचा रक्षक असणाऱ्या रामराया, माझा जन्म राक्षसवंशात झाला आहे. माझा देहच तामसी आहे म्हणून मला स्वाभाविकपणेच पाप प्रिय आहे, ज्याप्रमाणे घुबडाचे अंधारावर प्रेम असते.

**दोहा - श्रवन सुजसु सुनि आयउँ प्रभु भंजन भव भीर ।**
**त्राहि त्राहि आरति हरन सरन सुखद रघुबीर ।।२५८।।**

माझे रामप्रभु तत्काळ भयनाश करणारे आहेत, असे आपले सुयश ऐकून मी आपणापाशी आलो आहे. शरण आलेल्यांचे दुःखहरण करून त्यांना आनंद देणाऱ्या हे रघुनाथा ! माझे रक्षण करा.’’



**अस कहि करत दंडवत देखा । तुरत उठे प्रभु हरष बिसेषा ॥**
**दीन बचन सुनि प्रभु  मन भावा । भुज बिसाल गहि हृदयँ लगावा ॥२५९॥**

असे म्हणून प्रणाम करणाऱ्या बिभीषणाला श्रीरामांनी पाहिले. ते मोठ्या हर्षाने लागलीच उठले. बिभीषणाची विनम्र वचने ऐकून प्रभु प्रसन्न झाले व आपल्या विशाल बाहुंनी त्याला आलिंगन दिले.

**अनुज सहित मिलि ढिग बैठारी । बोले बचन भगत भय हारी ॥**
**कहु लंकेस सहित परिवारा । कुसल कुठाहर बास तुम्हारा ॥२६०॥**

धाकट्या बंधु लक्ष्मणासहित भेटून श्रीरामांनी त्याला आपल्यापाशी बसवले. त्यानंतर भक्तभयहारी रामप्रभु म्हणाले, ‘‘हे लंकेशा ! परिवारासह आपले कुशल सांग. तुझे घर तर अमंगळ स्थानी आहे.



**खल मंडलीं बसहु दिनु राती । सखा धरम निबहइ केहि भाँती ।।**
**मैं जानउँ तुम्हारि सब रीती । अति नय निपुन न भाव अनीति ।।२६१।।**

तू रात्रंदिवस दुष्ट लोकांमध्ये राहतोस. मित्रा ! तेथे तुझ्या धर्माचा निभाव कशा प्रकारे लागतो? मी तुझा सर्व व्यवहार जाणतो. तू मोठा नीतिनिपुण आहेस; तुला अनीति आवडत नाही.''

**बरु भल बास नरक कर ताता । दुष्ट संग जनि देइ बिधाता ।।**
**अब पद देखि कुसल रघुराया । जौं तुम्ह कीन्हि जानि जन दाया ।।२६२।।**

बिभीषण म्हणाला, '' हे तात ! एकवेळ नरकवास परवडला पण विधाता दुष्टांची संगत न देवो. हे रघुराया ! जेव्हा तुम्ही सेवक समजून मजवर दया केली आहे तर आता आपल्या चरणांच्या दर्शनाने सर्व कुशल आहे.''



दोहा - तब लगि कुसल न जीव कहुँ सपनेहुँ मन बिश्राम ।
जब लगि भजत न राम कहुँ सोक धाम तजि काम ॥२६३॥

जोवर जीव शोकधाम असलेल्या विषयवासनांना सोडून श्रीरामास भजत नाही, तोवर जीवाचे कुशल होणे नाही आणि स्वप्नातही त्याच्या मनाला शान्ती नाही.

तब लगि हृदयँ बसत खल नाना । लोभ मोह मच्छर मद माना ॥
जब लगि उर न बसत रघुनाथा । धरें चाप सायक कटि भाथा ॥२६४॥

लोभ, मोह, मत्सर, मद आणि मान इत्यादी अनेक दुष्ट तोपर्यंतच हृदयात राहतात, जोपर्यंत धनुष्य बाण घेतलेले व कमरेस भाता बांधलेले श्रीराम हृदयात वसत नाहीत, दिसतही नाहीत.

ममता तरुन तमी अँधिआरी । राग द्वेष उलूक सुखकारी ॥
तब लगि बसति जीव मन माहीं । जब लगि प्रभु प्रताप रबि नाहीं ॥२६५॥



आसक्ती ही राग-द्वेषरूपी घुबडांना सुख देणारी काळोखी रात्र आहे. जोपर्यंत प्रभुंचा प्रतापरूपी सूर्य उदय पावत नाही तोपर्यंतच ती आसक्तिरूपी अंधारी रात्र  जीवाच्या मनात वसते.

**अब मैं कुसल मिटे भय भारे । देखि राम पद कमल तुम्हारे ॥**
**तुम्ह कृपाल जा पर अनुकूला । ताहि न ब्याप त्रिबिध भवसूला ॥२६६॥**

‘‘हे श्रीरामा ! आता मी आपल्या चरणकमलांचे दर्शन करून सकुशल आहे. माझे सारे भय नाहीसे झाले आहे. हे कृपाळा ! आपण ज्याला अनुकूल असता त्याला तीनही प्रकारची भवव्यथा बाधत नाही.

**मैं निसिचर अति अधम सुभाऊ । सुभ आचरनु कीन्ह नहिं काऊ ॥**
**जासु रूप मुनि ध्यान न आवा । तेहिं प्रभु हरषि हृदयँ मोहि लावा ॥२६७॥**

मी फार वाईट स्वभावाचा राक्षस होतो. मी काही शुभ आचरण केलेले नव्हते. ज्यांचे

रूप मुनींच्या ध्यानात सहजतेने येत नाही (त्यासाठी त्यांना तपश्चर्या करावी लागते) अशा प्रभुंनी त्या प्रत्यक्ष रूपात प्रेमाने मला हृदयाशी धरले. (बिभीषण काया-वाचा-मनाने पूर्णपणे शरण गेल्यामुळेच.)

**दोहा - अहोभाग्य मम अमित अति राम कृपा सुख पुंज ।**
**देखेउँ नयन बिरंचि सिव सेब्य जुगल पद कंज ॥२६८॥**

कृपासुखपुंज रामा ! माझे असीम असे भाग्य आहे की मी माझ्या डोळ्यांनी त्या चरणयुगुलाचे दर्शन घेतले, जे ब्रह्मदेव,शिव ह्यांद्वारे सदैव सेविले जातात.''

**सुनहु सखा निज कहउँ सुभाऊ । जान भुसुंडि संभु गिरिजाऊ ॥**
**जौं नर होइ चराचर द्रोही । आवै सभय सरन तकि मोही ॥२६९॥**

श्रीराम म्हणाले,'' मित्रा ऐक ! मी माझा स्वभाव सांगतो. माझा स्वभाव काकभुशुंडी, पार्वती व शिव जाणतात. जरी एखाद्या मानवाने संपूर्ण चराचराशी द्रोह केलेला असेल परंतु तरीही पश्चात्ताप होऊन तो जर मला शरण आला,



**तजि मद मोह कपट छल नाना । करउँ सद्य तेहि साधु समाना ।।**
**जननी जनक बंधु सुत दारा । तनु धनु भवन सुहृद परिवारा ।।२७०।।**

तर मग मी त्याला मद, मोह, कपट आणि विविध प्रकारच्या लबाड्या इत्यादि दुर्गुणांचा त्याग करण्यास सहाय्य करतो आणि त्यास श्रेष्ठ सज्जन बनवतो. माता, पिता, भाऊ, पुत्र, पत्नी, शरीर, धन, गृह, मित्र व परिवार,

**सब कै ममता ताग बटोरी । मम पद मनहि बाँध बरि डोरी ।।**
**समदरसी इच्छा कछु नाहीं । हरष सोक भय नहिं मन माहीं ।।२७१।।**

यांची आसक्ती त्यागून जो स्वत:च्या मनाला माझ्या चरणांशी बांधतो, जो सहिष्णु आहे, ज्याला काही इच्छा नाही व ज्याच्या मनात हर्ष, शोक व भय नाही;

**अस सज्जन मम उर बस कैसें । लोभी हृदयँ बसइ धनु जैसें ।।**
**तुम्ह सारिखे संत प्रिय मोरें । धरउँ देह नहिं आन निहोरें ।।२७२।।**

असे सज्जन पुरुष माझ्या हृदयात असे राहतात, जसे लोभ्याच्या हृदयात धन वसते. तुझ्यासारखे संत मला प्रिय आहेत. अशाच सज्जनांसाठी मी देह धारण करतो, दुसऱ्या कोणत्याही कारणासाठी नाही.

**दोहा - सगुन उपासक परहित निरत नीति दृढ़ नेम ।**
**ते नर प्रान समान मम जिन्ह कें द्विज पद प्रेम ।।२७३।।**

जे सगुणोपासक आहेत, दुसऱ्याच्या हितात रत आहेत, नीतित दृढनेमी आहेत, तसेच ज्यांचे गायत्री उपासकांच्या चरणांवर प्रेम आहे; ती माणसे मला प्राणासमान प्रिय आहेत.

**सुनु लंकेस सकल गुन तोरें । तातें तुम्ह अतिसय प्रिय मोरें ।।**
**राम बचन सुनि बानर जूथा । सकल कहहिं जय कृपाबरूथा ।।२७४।।**

लंकेशा, ऐक ! तुझ्यात हे सगळे गुण आहेत. त्यामुळे तू मला अतिशय प्रिय



आहेस.'' श्रीरामांचे बोलणे ऐकून सगळ्या वानरांचा समूह म्हणू लागला, ''कृपाघन श्रीरामप्रभुंचा विजय असो. ''



**सुनत बिभीषनु प्रभु कै बानी । नहिं अघात श्रवनामृत जानी ।।**
**पद अंबुज गहि बारहिं बारा । हृदयँ समात न प्रेमु अपारा ।।२७५।।**

प्रभुंची वाणी ऐकून ते श्रवणामृत समजून बिभीषणाची तृप्ती झाली नाही. तो वारंवार प्रभुंचे चरण पकडतो. अपार प्रेम त्याच्या हृदयात मावत नाही.

**सुनहु देव सचराचर स्वामी । प्रनतपाल उर अंतरजामी ।।**
**उर कछु प्रथम बासना रही । प्रभु पद प्रीति सरित सो बही ।।२७६।।**

बिभीषण म्हणाले, '' देवा ! अहो चराचराचे स्वामी, ऐका ! आपण शरणागताचे पालन करणारे आहात व सगळ्यांच्या हृदयातील मर्म जाणणारे आहात. माझ्या मनात पूर्वी थोडीफार वासना होती, पण ती आपल्या चरणांवरील प्रेमाच्या नदीत वाहून गेली.

**अब कृपाल निज भगति पावनी । देहु सदा सिव मन भावनी ।।**
**एवमस्तु कहि प्रभु रनधीरा । मागा तुरत सिंधु कर नीरा ।।२७७।।**

हे कृपाळा ! शिवांच्या मनाला सदैव आवडणारी तुमची पवित्र करणारी भक्ती मला द्या.'' रणधीर रणसिंह श्रीरामप्रभुंनी 'एवमस्तु' (असेच होवो) असे म्हणून ताबडतोब समुद्राचे जल मागवले.

**जदपि सखा तव इच्छा नाहीं । मोर दरसु अमोघ जग माहीं ।।**
**अस कहि राम तिलक तेहि सारा । सुमन बृष्टि नभ भई अपारा ।।२७८।।**

''मित्रा ! जरी तुझी इच्छा नसली तरी जगात माझे दर्शन अमोघ आहे'', असे म्हणून श्रीरामांनी त्याला राजतिलक लावला. ह्यावेळेस आकाशातून फुलांचा अपार वर्षाव झाला.

**दोहा - रावन क्रोध अनल निज स्वास समीर प्रचंड ।**
**जरत बिभीषनु राखेउ दीन्हेउ राजु अखंड ।।२७९।।**



आपल्या श्वासरूपी वायूने प्रचंड होणाऱ्या रावणाच्या क्रोधरूपी अग्नीत जळणाऱ्या बिभीषणाला श्रीरामांनी वाचवले व अखंड राज्य दिले.

**जो संपति सिव रावनहि दीन्हि दिएँ दस माथ ।**
**सोइ संपदा बिभीषनहि सकुचि दीन्हि रघुनाथ ।।२८०।।**

जी संपत्ती शंकराने रावणाला दहा शिरे कापून वाहिल्यावर दिली होती, तीच संपत्ती श्रीरामांनी बिभीषणाला फक्त चरणांवर मस्तक ठेवताच दिली.

**अस प्रभु छाड़ि भजहिं जे आना । ते नर पसु बिनु पूँछ बिषाना ।।**
**निज जन जानि ताहि अपनावा । प्रभु सुभाव कपि कुल मन भावा ।।२८१।।**

अशा रामप्रभुंना सोडून जे लोक दुसऱ्याला भजतात, ते जणू शिंगे व शेपटी नसलेले पशूच आहेत. बिभीषणाला आपले सेवक समजून श्रीरामांनी आपले मानले. प्रभुंचा हा स्वभाव वानरकुलाला अतिशय आवडला.



**पुनि सर्बग्य सर्ब उर बासी । सर्बरूप सब रहित उदासी ।।**
**बोले बचन नीति प्रतिपालक । कारन मनुज दनुज कुल घातक ।।२८२।।**

सर्वज्ञ, सर्वांच्या हृदयात निवास करणारे, सर्वरूप, रूपातीत, वैराग्याचे वैराग्य असणारे, नीतिरक्षक, सज्जनपरित्राणासाठी मनुष्यरूप धारण करणारे, राक्षसकुलाचा नाश करणारे श्रीराम पुढे म्हणाले,

**सुनु कपीस लंकापति बीरा । केहि बिधि तरिअ जलधि गंभीरा ।।**
**संकुल मकर उरग झष जाती । अति अगाध दुस्तर सब भाँती ।।२८३।।**

"वानरांचे राजा सुग्रीव व लंकापती बिभीषण, वीरांनो ऐका ! खोल समुद्र कशा प्रकारे पार केला जाईल ? अनेक जातींचे मगर, साप व मासे असलेला असा हा समुद्र अत्यंत अथांग व सर्व प्रकारे दुस्तर आहे."

कह लंकेस सुनहु रघुनायक । कोटि सिंधु सोषक तव सायक ।।
जद्यपि तदपि नीति असि गाई । बिनय करिअ सागर सन जाई ।।२८४।।

बिभीषण म्हणाला, "हे श्रीरघुनायका ऐका ! आपल्या एका बाणाने कोटी समुद्र शोषून घेतले जातील; तरी नीति अशी सांगितली आहे की पहिल्यांदा समुद्राला विनंती केली जावी.

दोहा - प्रभु तुम्हार कुलगुर जलधि कहिहि उपाय बिचारि ।
बिनु प्रयास सागर तरिहि सकल भालु कपि धारि ।।२८५।।

प्रभो ! समुद्र आपला पूर्वज कुलगुरु आहे. तो विचार करून ह्यावर उपाय सांगेल. मग त्याप्रमाणे अस्वले व वानर ह्यांची सेना विनाकष्ट समुद्र पार करतील."

सखा कही तुम्ह नीकि उपाई । करिअ दैव जौं होइ सहाई ।।
मंत्र न यह लछिमन मन भावा । राम बचन सुनि अति दुख पावा ।।२८६।।



श्रीराम म्हणाले, ‘‘मित्रा, तू चांगला उपाय सांगितलास. जर दैवाने तो (समुद्र) सहायक होणार असेल तर कार्य होईल.’’ परंतु लक्ष्मणाला हा सल्ला आवडला नाही. श्रीरामांचे बोलणे ऐकून त्याला फार दुःख झाले.

**नाथ दैव कर कवन भरोसा । सोषिअ सिंधु करिअ मन रोसा ।।**
**कादर मन कहुँ एक अधारा । दैव दैव आलसी पुकारा ।।२८७।।**

लक्ष्मण म्हणाला, ‘‘ नाथ ! दैवाचा काय भरवसा ? मनात क्रोध धारण करून सर्व समुद्र सुकवून टाका. दैवावर तर आळशी लोक भरवसा ठेवतात. हे दैव तर एकमात्र आधार फक्त भित्र्या लोकांकरिता आहे.’’

**सुनत बिहसि बोले रघुबीरा । ऐसेहिं करब धरहु मन धीरा ।।**
**अस कहि प्रभु अनुजहि समुझाई । सिंधु समीप गए रघुराई ।।२८८।।**

हे ऐकताच श्रीराम हसून म्हणाले, ‘‘मनात धीर धर; मी असेच करीन.’’ असे म्हणून



रघुकुलाराजा रामप्रभु, धाकट्या भावास लक्ष्मणास समजावून समुद्राजवळ गेले.

**प्रथम प्रनाम कीन्ह सिरु नाई । बैठे पुनि तट दर्भ डसाई ।।**
**जबहिं बिभीषन प्रभु पहिं आए । पाछें रावन दूत पठाए ।।२८९।।**

प्रथम श्रीरामांनी समुद्राला नमस्कार केला व त्यानंतर ते दर्भ अंथरून बसले. इकडे जसे बिभीषण श्रीरामांकडे आले, तसे रावणाने त्याच्यामागे दूत धाडले.

**दोहा - सकल चरित तिन्ह देखे धरें कपट कपि देह ।**
**प्रभु गुन हृदयँ सराहहिं सरनागत पर नेह ।।२९०।।**

त्या दूतांनी कपटाने वानरांचे शरीर धारण करून श्रीरामांचे सर्व आचरण पाहिले. शरणागतावर प्रभुंचे प्रेम व त्यांचे गुण पाहून ते रावणाचे दूत मनात रामाची प्रशंसा करू लागले.



**प्रगट बखानहिं राम सुभाऊ । अति सप्रेम गा बिसरि दुराऊ ॥**
**रिपु के दूत कपिन्ह तब जाने । सकल बाँधि कपीस पहिं आने ॥२९१॥**

मग ते प्रत्यक्षपणे मोठ्या प्रेमाने श्रीरामांच्या स्वभावाचे वर्णन करू लागले. ते आपला कपटवेश लपवायला विसरून गेले. तेव्हा वानरांना कळले की हे शत्रूचे दूत आहेत म्हणून मग वानरांनी त्या दूतांना बांधून सुग्रीवाकडे आणले.

**कह सुग्रीव सुनहु सब बानर । अंग भंग करि पठवहु निसिचर ॥**
**सुनि सुग्रीव बचन कपि धाए । बाँधि कटक चहु पास फिराए ॥२९२॥**

सुग्रीव म्हणाला, “ वानरांनो ऐका, ह्या राक्षसांचा अंगभंग करून पाठवून द्या.” सुग्रीवाचे सांगणे ऐकताच सगळे वानर धावले व दूतांना बांधून सेनेच्या चोहीकडे फिरवले.

**बहु प्रकार मारन कपि लागे । दीन पुकारत तदपि न त्यागे ।।**
**जो हमार हर नासा काना । तेहि कोसलाधीस कै आना ।।२९३।।**

वानर निरनिराळ्या प्रकारे त्यांना मारू लागले. दूतांनी दीनभावाने विनविल्यानंतरही वानरांनी त्यांना सोडले नाही. " जे आमचे नाक, कान कापतील त्यांना कोसलराज श्रीरामांची शपथ आहे", असे शेवटी ते दूत म्हणाले.

**सुनि लछिमन सब निकट बोलाए । दया लागि हँसि तुरत छोड़ाए ।।**
**रावन कर दीजहु यह पाती । लछिमन बचन बाचु कुलघाती ।।२९४।।**

हे ऐकून लक्ष्मणाने सर्वांना जवळ बोलावले. त्याला दूतांची दया आली म्हणून त्याने हसून लागलीच त्या दूतांना सोडवले. लक्ष्मण त्यांना म्हणाला, " तुम्ही रावणाला हे पत्र द्या व सांगा; हे कुलनाशका, लक्ष्मणाचे शब्द वाच."



दोहा - कहेहु मुखागर मूढ़ सन मम संदेसु उदार ।
सीता देइ मिलहु न त आवा कालु तुम्हार ।।२९५।।

"त्या मूर्खाला तोंडीदेखील माझा उदार संदेश सांगा की सीतेला परत देऊनच भेट, नाहीतर तुझा काळ आला आहे."

तुरत नाइ लछिमन पद माथा । चले दूत बरनत गुन गाथा ।।
कहत राम जसु लंकाँ आए । रावन चरन सीस तिन्ह नाए ।।२९६।।

ताबडतोब लक्ष्मणाच्या चरणांवर डोके ठेवून ते दूत श्रीरामांच्या गुणांचे वर्णन करत निघाले. ते श्रीरामांचे यश सांगत लंकेत आले व त्यांनी रावणाच्या चरणांवर डोके ठेवले.

बिहसि दसानन पूँछी बाता । कहसि न सूक आपनि कुसलाता ।।
पुनि कहु खबरि बिभीषन केरी । जाहि मृत्यु आई अति नेरी ।।२९७।।

तेव्हा रावणाने हसून वृत्त विचारले, ‘‘अरे शूका (दूता), आपले कुशल का सांगत नाहीस? मग तू त्या बिभीषणाची स्थिती सांग, ज्याचे मरण अगदी जवळ आले आहे.

**करत राज लंका सठ त्यागी । होइहि जव कर कीट अभागी ॥**
**पुनि कहु भालु कीस कटकाई । कठिन काल प्रेरित चलि आई ॥२९८॥**

राज्य करताना त्या मूर्खाने लंका सोडली. आता तो अभागी कळपातील किड्याप्रमाणे होईल म्हणजे शत्रूबरोबर तो किड्याप्रमाणे मारला जाईल.  तू अस्वले व वानरांच्या सेनेचे हाल सांग, जी कठीण काळाच्या प्रेरणेने येथे आली आहे व

**जिन्ह के जीवन कर रखवारा । भयउ मृदुल चित सिंधु बिचारा ॥**
**कहु तपसिन्ह कै बात बहोरी । जिन्ह के हृदयँ त्रास अति मोरी ॥२९९॥**

कोमल स्वभावाचा बिचारा समुद्र ज्यांच्या जीवनाचा रक्षक झाला आहे. जर

समुद्राने रस्ता दिला असता तर ते आतापर्यंत राक्षसांचा आहार झाले असते. त्या दोन्ही तपस्व्यांचे वृत्त सांग, ज्यांच्या हृदयात माझ्याविषयी भय आहे.

**दोहा - की भइ भेंट कि फिरि गए श्रवन सुजसु सुनि मोर ।**
**कहसि न रिपु दल तेज बल बहुत चकित चित तोर ॥३००॥**

त्यांची तुझी भेट झाली की माझे सुयश कानाने ऐकून ते परत गेले? शत्रुदलाचे तेज व बल तू सांगत का नाहीस? असे दिसते की तुझे चित्त अगदी चकित झाले आहे.''

**नाथ कृपा करि पूँछेहु जैसें । मानहु कहा क्रोध तजि तैसें ॥**
**मिला जाइ जब अनुज तुम्हारा । जातहिं राम तिलक तेहि सारा ॥३०१॥**

दूत म्हणाला - ''नाथ ! जसे आपण कृपा करून विचारलेत, तसेच क्रोध सोडून माझे सांगणे ऐका माझ्यावर विश्वास ठेवा. जेव्हा तुमचे बंधू बिभीषण रामाला जाऊन मिळाले, ते जाताच श्रीरामांनी त्यांना राजतिलक केला.

**रावन दूत हमहि सुनि काना । कपिन्ह बाँधि दीन्हे दुख नाना ।।**
**श्रवन नासिका काटैं लागे । राम सपथ दीन्हे हम त्यागे ।।३०२।।**

हे ऐकताच की आम्ही रावणाचे दूत आहोत; वानर आम्हाला बांधून आमचे नाक व कान कापू लागले. पण श्रीरामांची शपथ घातल्यावर त्यांनी आम्हाला सोडून दिले.

**पूँछिहु नाथ राम कटकाई । बदन कोटि सत बरनि न जाई ।।**
**नाना बरन भालु कपि धारी । बिकटानन बिसाल भयकारी ।।३०३।।**

हे नाथ ! आपण जे श्रीरामांच्या सेनेचे वर्णन विचारलेत, ते कोटी मुखांनीदेखील वर्णन करता येणार नाही. अनेक रंगांची अस्वले व वानरांची अशी ती सेना आहे. ते विशालकाय, विकटमुखी व शत्रूच्या मनात भय उत्पन्न करणारे आहेत.

**जेहिं पुर दहेंउ हतेउ सुत तोरा । सकल कपिन्ह महँ तेहि बलु थोरा ।।**
**अमित नाम भट कठिन कराला । अमित नाग बल बिपुल बिसाला ।।३०४।।**

ज्या वानराने लंका जाळली व आपल्या पुत्राला मारले त्याचे बळ सगळ्या वानरांपेक्षा थोर आहे. अगणित असे कठीण व धुरंधर योद्धे आहेत, जे विशालकाय असून त्यांच्यात अगणित हत्तींचे बळ आहे.

**दोहा - द्विबिद मयंद नील नल अंगद गद बिकटासि ।**
**दधिमुख केसरि निसठ सठ जामवंत बलरासि ।।३०५।।**

द्विविद, मयंद, नील, नल, अंगद, गद, विकटास्य, दधिमुख, केसरी, निशठ, शठ व जांबुवंत इत्यादि जणू बलाची रासच आहेत.

**ए कपि सब सुग्रीव समाना । इन्ह सम कोटिन्ह गनइ को नाना ।।**
**राम कृपाँ अतुलित बल तिन्हहीं । तृन समान त्रैलोकहि गनहिं ।।३०६।।**



हे सगळे वानर सुग्रीवाप्रमाणे बलवान आहेत व यांच्याप्रमाणे कोट्यवधी आहेत. त्या सगळ्यांना कोण मोजू शकेल ? श्रीरामांच्या कृपेने त्यांच्यात अतुल बल आहे. ते तीनही लोक तृणासमान समजतात.

**अस मैं सुना श्रवन दसकंधर । पदुम अठारह जूथप बंदर ।।**
**नाथ कटक महँ सो कपि नाहीं । जो न तुम्हहि जीतै रन माहीं ।।३०७।।**

हे महाराज, रावण ! मी असे ऐकले की अठरा पद्म वानरसेना आहे. हे नाथ! सेनेत एकही वानर असा नाही, की जो युद्धात तुम्हाला हार जाईल.

**परम क्रोध मीजहिं सब हाथा । आयसु पै न देहिं रघुनाथा ।।**
**सोषहिं सिंधु सहित झष ब्याला । पूरहिं न त भरि कुधर बिसाला ।।३०८।।**

ते युद्धासाठी मोठ्या क्रोधाने हात चोळत आहेत, पण त्यांना अजून श्रीरामांची आज्ञा नाही. ते म्हणतात की

आम्ही मासे व सर्पांसह हा समुद्र शोषून घेऊ; नाहीतर मोठमोठे पर्वत टाकून त्याला भरुन टाकू

**मर्दि गर्द मिलवहिं दससीसा । ऐसेइ बचन कहहिं सब कीसा ।।**
**गर्जहिं तर्जहिं सहज असंका । मानहुँ ग्रसन चहत हहिं लंका ।।३०९।।**

व रावणाला तुडवून धुळीत मिसळून टाकू. बस, अशाच गोष्टी सगळे वानर करत आहेत. स्वाभाविकच निर्भयवान असे ते गर्जत आहेत व धमकी देत आहेत. जणूकाही लंकेला गिळून टाकायला निघाले आहेत.

**दोहा - सहज सूर कपि भालु सब पुनि सिर पर प्रभु राम ।**
**रावन काल कोटि कहुँ जीति सकहिं संग्राम ।।३१०।।**

एकतर सगळेच वानर व अस्वले शूर वीर आहेत. त्यात त्यांच्यावर प्रभु रामचंद्रांचा वरदहस्त आहे. हे महाराज रावण ! ते लढाईत कोटी काळाला पण जिंकू शकतात.



**राम तेज बल बुधि बिपुलाई । सेष सहस सत सकहिं न गाई ।।**
**सक सर एक सोषि सत सागर । तब भ्रातहि पूँछेउ नय नागर ।।३११।।**

श्रीरामांच्या तेज, बल व बुद्धीच्या अनंतत्वाचे वर्णन हजारो शेषदेखील करू शकत नाहीत. ते एकाच बाणाने शेकडो समुद्र सुकवू शकतात; परंतु ते नीतिमर्यादानिपुण आहेत म्हणून असे न करता त्यांनी तुमचा भाऊ बिभीषण ह्याला समुद्र पार करण्याचा उपाय विचारला.''

**तासु बचन सुनि सागर पाहीं । मागत पंथ कृपा मन माहीं ।।**
**सुनत बचन बिहसा दससीसा । जौं असि मति सहाय कृत कीसा ।।३१२।।**

दूताचे बोलणे ऐकून की श्रीराम समुद्राकडे रस्ता मागत आहेत, ते अत्यंत कृपाळू आहेत म्हणूनच समुद्राला शोषत नाहीत, हे ऐकून रावण हसला व म्हणाला, ‘‘अशी बुद्धी असल्यामुळेच वानरांचे सहाय्य घेतले आहे.



**सहज भीरु कर बचन दृढ़ाई । सागर सन ठानी मचलाई ।।**
**मूढ़ मृषा का करसि बड़ाई । रिपु बल बुद्धि थाह मैं पाई ।।३१३।।**

स्वाभाविकपणे भित्र्या असलेल्या बिभीषणाच्या वचनावर विश्वास ठेवून समुद्राकडे लहान मुलासारखा हट्ट धरला आहे. अरे मूर्खा, तू काय त्यांची खोटी बढाई सांगतोस? मला शत्रूच्या बळाची व बुद्धीची कल्पना आली.

**सचिव सभीत बिभीषन जाकें । बिजय बिभूति कहाँ जग ताकें ।।**
**सुनि खल बचन दूत रिस बाढ़ी । समय बिचारि पत्रिका काढ़ी ।।३१४।।**

भित्रा बिभीषण ज्याचा मंत्री आहे, त्याच्या नशिबात विजय व ऐश्वर्य नाही.'' दुष्ट रावणाचे बोलणे ऐकून दूताचा क्रोध वाढला. त्याने योग्य वेळ पाहून लक्ष्मणाचे पत्र काढले.

**रामानुज दीन्ही यह पाती । नाथ बचाइ जुड़ावहु छाती ।।**
**बिहसि बाम कर लीन्ही रावन । सचिव बोलि सठ लाग बचावन ।।३१५।।**



तो म्हणाला, “श्रीरामांच्या धाकट्या भावाने, लक्ष्मणाने हे पत्र दिले आहे. हे वाचून तरी जीव वाचवा.” रावणाने हसून ते पत्र डाव्या हाताने घेतले व मंत्र्याला बोलावून ते वाचायला सांगितले.

**दोहा - बातन्ह मनहि रिझाइ सठ जनि घालसि कुल खीस ।**
**राम बिरोध न उबरसि सरन बिष्नु अज ईस ॥३१६॥**

त्यात लिहिले होते, ‘अरे शठा ! मोठमोठ्या बाता मारून कुलाचा वध करवून घेऊन नाश करू नकोस. श्रीरामांना विरोध करून तू विष्णु , ब्रह्मदेव व शिव ह्यांना शरण जाऊनही वाचणार नाहीस.

**की तजि मान अनुज इव प्रभु पद पंकज भृंग ।**
**होहि कि राम सरानल खल कुल सहित पतंग ॥३१७॥**

एकतर तू अहंकार सोडून आपला धाकटा भाऊ बिभीषण ह्याच्याप्रमाणे प्रभुंच्या चरणकमली भुंगा होऊन रहा; नाहीतर हे दुष्टा, श्रीरामांच्या बाणरूपी अग्नीत परिवारासहित पतंग होऊन जळून जाशील.’



**सुनत सभय मन मुख मुसुकाई । कहत दसानन सबहि सुनाई ।।**
**भूमि परा कर गहत अकासा । लघु तापस कर बाग बिलासा ।।३१८।।**

पत्र ऐकताच रावण मनातून भयभीत झाला परंतु तोंडावर खोटे हसू आणून सर्वांना ऐकू जाईल असे म्हणाला की जणू काहीं कोणी पृथ्वीवर पडल्यापडल्या आकाशाला पकडण्याचा प्रयत्न करतो आहे, तसा त्या छोट्या तपस्व्याचा हा वाग्विलास आहे.

**कह सूक नाथ सत्य सब बानी । समुझहु छाड़ि प्रकृति अभिमानी ।।**
**सुनहु बचन मम परिहरि क्रोधा । नाथ राम सन तजहु बिरोधा ।।३१९।।**

रावणाचा दूत (शूक) म्हणाला, ''हे नाथ ! अहंकारी स्वभाव सोडून समजून घ्या की पत्रात लिहिलेल्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. स्वामी ! न रागवता माझे ऐका, श्रीरामांना विरोध करू नका.

**अति कोमल रघुबीर सुभाऊ । जद्यपि अखिल लोक कर राऊ ।।**
**मिलत कृपा तुम्ह पर प्रभु करिहि । उर अपराध न एकउ धरिही ।।३२०।।**



अखिल विश्वाचे स्वामी असूनही श्रीराम कोमल स्वभावाचे आहेत. भेट होताच प्रभु तुमच्यावर कृपा करतील व चित्ती तुमचा एकही अपराध मानणार नाहीत.

**जनकसुता रघुनाथहि दीजे । एतना कहा मोर प्रभु कीजे ।।**
**जब तेहिं कहा देन बैदेही । चरन प्रहार कीन्ह सठ तेही ।।३२१।।**

प्रभो ! माझे एवढे सांगणे ऐका की जानकीला पुन्हा सन्मानाने श्रीरामांना परत द्या.'' जेव्हा दूताने जानकीला देण्याची गोष्ट काढली तेव्हा दुष्ट रावणाने त्याला एक लाथ मारली.

**नाइ चरन सिरु चला सो तहाँ । कृपासिंधु रघुनायक जहाँ ।।**
**करि प्रनामु निज कथा सुनाई । राम कृपाँ आपनि गति पाई ।।३२२।।**

चरणांवर मस्तक ठेवून तो दूत, कृपासागर रघुनाथ जेथे होते तेथे गेला. त्याने प्रभुंना प्रणाम करून सर्व वृत्त सांगितले व त्यांच्या कृपेने त्याने पुढील गती प्राप्त केली अर्थात मुनीचे स्वरूप पुन्हा प्राप्त केले.



रिषि अगस्ति कीं साप भवानी । राछस भयउ रहा मुनि ग्यानी ।।
बंदि राम पद बारहिं बारा । मुनि निज आश्रम कहुँ पगु धारा ।।३२३।।

शिव म्हणतात, ''हे भवानी, आधी तो ज्ञानी मुनी होता व अगस्ति ऋषींच्या शापाने राक्षस झाला होता. श्रीरामांना वारंवार वंदन करून तो मुनी आश्रमात निघून गेला.''

दोहा - बिनय न मानत जलधि जड़ गए तीनि दिन बीति ।
बोले राम सकोप तब भय बिनु होइ न प्रीति ।।३२४।।

इकडे तीन दिवस झाले परंतु जडमती समुद्र विनंती ऐकेना. तेव्हा श्रीराम रागाने म्हणाले, ''धाक, भीती दाखविल्याशिवाय ह्या जडमती समुद्राठायी प्रीति उत्पन्न होणार नाही.

लछिमन बान सरासन आनू । सोषौं बारिधि बिसिख कृसानू ।।
सठ सन बिनय कुटिल सन प्रीति । सहज कृपन सन सुंदर नीति ।।३२५।।

लक्ष्मणा ! धनुष्यबाण आण. मी अग्निबाणाने समुद्र सुकवून टाकतो. नाठाळाला



विनंती, दुष्टावर प्रेम, स्वभावाने कंजूष असणाऱ्याशी सुंदर नीति,

**ममता रत सन ग्यान कहानी । अति लोभी सन बिरति बखानी ।।**
**क्रोधिहि सम कामिहि हरिकथा । ऊसर बीज बएँ फल जथा ।।३२६।।**

मोहममतेत असणाऱ्या मनुष्याला ज्ञानाची कथा, अत्यंत लोभी माणसापुढे वैराग्याचे वर्णन, रागीटाशी शांतीची चर्चा व वासनाग्रस्तासमोर ईश्वराच्या कथेचे तेच फळ आहे, जे नापीक जमिनीत बी पेरण्याचे आहे.''

**अस कहि रघुपति चाप चढ़ावा । यह मत लछिमन के मन भावा ।।**
**संधानेउ प्रभु बिसिख कराला । उठी उदधि उर अंतर ज्वाला ।।३२७।।**

असे म्हणून श्रीरामांनी धनुष्यावर बाण चढवला. त्यांचे हे करणे लक्ष्मणाला खूप आवडले. प्रभुंनी तेजस्वी अग्निबाण चढवला, ज्याने समुद्राच्या हृदयात ज्वाला पेटली.



**मकर उरग झष गन अकुलाने । जरत जंतु जलनिधि जब जाने ।।**
**कनक थार भरि मनि गन नाना । बिप्र रूप आयउ तजि माना ।।३२८।।**

मगर, सर्प व माशांचे समूह घाबरले. जेव्हा समुद्राने पाहिले की सर्व जीव जळत आहेत, तेव्हा सोन्याच्या ताटात नाना प्रकारची रत्ने भरून तो दुरभिमान सोडून ब्राह्मणाच्या वेषात आला.

**दोहा - काटेहिं पइ कदरी फरइ कोटि जतन कोउ सींच ।**
**बिनय न मान खगेस सुनु डाटेहिं पइ नव नीच ।।३२९।।**

काकभुशुंडी म्हणतात, ''हे गरुडा ! कोणी कोटी प्रयत्न करून सिंचले तरी केळी कापल्यानेच फळ देतात. विनंती करण्याने नीच मानत नाही, दटावण्यानेच नमतो.''

**सभय सिंधु गहि पद प्रभु केरे । छमहु नाथ सब अवगुन मेरे ।।**
**गगन समीर अनल जल धरनी । इन्ह कइ नाथ सहज जड़ करनी ।।३३०।।**

समुद्र भयभीत होऊन प्रभुंचे चरण पकडून म्हणाला, ''माझ्या सगळ्या अवगुणांना

क्षमा करा नाथ ! आकाश, वायू, अग्नी, जल आणि पृथ्वी या सर्वांची करणी स्वाभाविकच जड आहे, स्वामी !

**तव प्रेरित मायाँ उपजाए । सृष्टि हेतु सब ग्रंथनि गाए ।।**
**प्रभु आयसु जेहि कहँ जस अहई । सो तेहि भाँति रहें सुख लहई ।।३३१।।**

ह्या सर्वांना आपल्या प्रेरणेने मायेने सृष्टीरचनेकरिता उत्पन्न केले आहे, असे सगळ्या ग्रंथांमध्ये सांगितले आहे. प्रभुंची ज्याच्याकरता जी आज्ञा असेल, तो त्याचप्रमाणे राहण्यात सुख मानतो.

**प्रभु भल कीन्ह मोहि सिख दीन्ही । मरजादा पुनि तुम्हरी कीन्ही ।।**
**प्रभु मरजादा जिन्ह जिन्ह तोरी । सकल ताड़ना के अधिकारी ।।३३२।।**

हे प्रभो ! मला धडा शिकविलात हे आपण चांगले केलेत कारण शेवटी मर्यादादेखील आपणच घातली आहे. रामप्रभुंनी घालून दिलेली मर्यादा ज्यांनी ज्यांनी म्हणून तोडली, ते सर्वजण ताडन करण्यायोग्यच आहेत.



**प्रभु प्रताप मैं जाब सुखाई । उतरिहि कटकु न मोरि बड़ाई ।।**
**प्रभु अग्या अपेल श्रुति गाई । करौं सो बेगि जो तुम्हहि सोहाई ।।३३३।।**

आपल्या प्रतापाने मी तर सुकून जाईन व सेनापण पार उतरेल. परंतु त्याने माझी मर्यादा नष्ट होईल, जी मला आपणच घालून दिली आहे. आपल्या आज्ञेचे उल्लंघन होऊ शकणार नाही असे वेदात सांगितले आहे; तेव्हा आता आपल्याला आवडेल तेच मी करीन.''

**दोहा - सुनत बिनीत बचन अति कह कृपाल मुसुकाइ ।**
**जेहि बिधि उतरै कपि कटकु तात सो कहहु उपाइ ।।३३४।।**

समुद्राचे अत्यंत विनयपूर्ण वचन ऐकून कृपाळू श्रीराम हसून म्हणाले, ''हे तात ! वानरांची सेना समुद्र पार करून जाईल असा उपाय सांगा.''

**नाथ नील नल कपि द्वौ भाई । लरिकाईं रिषि आसिष पाई ।।**
**तिन्ह कें परस किएँ गिरि भारे । तरिहहिं जलधि प्रताप तुम्हारे ।।३३५।।**



समुद्र म्हणाला, ‘‘हे नाथ ! नील व नल हे दोघे वानरबंधू आहेत. दोघांना लहानपणीच ऋषींचा आशीर्वाद मिळाला आहे. त्या दोघांच्या स्पर्शाने मोठमोठे पर्वतही आपल्या प्रतापाने समुद्रावर तरंगतील

**मैं पुनि उर धरि प्रभु प्रभुताई । करिहउँ बल अनुमान सहाई ।।**
**एहि बिधि नाथ पयोधि बँधाइअ । जेहिं यह सुजसु लोक तिहुँ गाइअ ।।३३६।।**

आणि मग मी प्रभुंचे मोठेपण लक्षात घेऊन माझ्या बळाप्रमाणे सहाय्य करीन. याप्रकारे हे नाथ ! समुद्राला बांधा, ज्यामुळे तीनही लोकांत आपले यश गायले जाईल.

**एहिं सर मम उत्तर तट बासी । हतहु नाथ खल नर अघ रासी ।।**
**सुनि कृपाल सागर मन पीरा । तुरतहिं हरी राम रनधीरा ।।३३७।।**

हे नाथ ! ह्या बाणाने माझ्या दुसऱ्या तीरावर राहणाऱ्या, पापांची रास असणाऱ्या दुष्टांचा वध करा.’’ समुद्राच्या मनातील दुःख ऐकून कृपाळू रणधीर श्रीरामाने लागलीच त्याचे दुःखहरण केले.



**देखि राम बल पौरुष भारी । हरषि पयोनिधि भयउ सुखारी ।।**
**सकल चरित कहि प्रभुहि सुनावा । चरन बंदि पाथोधि सिधावा ।।३३८।।**

श्रीरामांचे महान बल व पौरुष पाहून समुद्र प्रसन्न व सुखी झाला. त्याने त्या दुष्टांचे सर्व चरित्र प्रभुंना सांगितले व चरणांना वंदन करून तो निघून गेला.

**छंद-** **निज भवन गवनेउ सिंधु श्रीरघुपतिहि यह मत भायऊ**
**यह चरित कलि मलहर जथामति दास तुलसी गायऊ ।**
**सुख भवन संसय समन दवन बिषाद रघुपति गुन गना**
**तजि सकल आस भरोस गावहि सुनहि संतत सठ मना ।।३३९।।**

समुद्र निजस्थानी निघून गेला. राघवास, श्रीरामास त्याचे मत पटले. कलियुगातील पापांचे हरण करणारे हे चरित्र तुलसीदासांनी आपल्या बुद्धीनुसार गायले आहे. सुखाचे धाम, संशयाचा नाश करणारे व विषादाचे दमन करणाऱ्या रघुनाथांचे गुण; हे कपटी मना, तू अन्य सर्व आशा, भरवसा सोडून (फक्त एक त्या श्रीरामावरच भरवसा ठेवून)निरंतर गात व ऐकत जा.



दोहा - सकल सुमंगल दायक रघुनायक गुन गान ।
सादर सुनहिं ते तरहिं भव सिंधु बिना जलजान ।।३४०।।

रघुनायकश्रीरामांचे गुणगान सर्वस्वी सर्वांना उचित,अत्यंत मंगल देणारे असे आहे.जे आदरपूर्वक ह्याचे श्रवण करतात,ते जणू नौकेविनाच हा भवसागर तरून जातात,असे विश्वासाने श्रीतुलसीदास सांगतात.



इति श्रीमद्रामचरितमानसे
सकलकलिकलुषविध्वंसने पञ्चमः सोपानः समाप्तः।

अशा प्रकारे कलियुगातील अवघ्या पापांचा नाश करणाऱ्या श्रीरामचरितमानसाचा पाचवा सोपान संपूर्ण झाला.

।। इति सुन्दरकाण्डः ।।



प्रकाशक - **श्री सुचितदा आर्टस्**
नवनीत, फ्लॅट नं ३, राम मारुती रोड,
शिवाजी पार्क पोलीस चौकीसमोर,
दादर (प.), मुंबई-४०००२८.

मुद्रक : **ईशा पश्यंति प्रिन्टर्स**
प्लॉट नं. ५४, सेक्टर-१
दि वसई तालुका इन्डस्ट्रियल को-ऑप. इस्टेट लिमिटेड,
गवराई पाडा, वसई (पू.), जि.ठाणे-४०१२०८

मूल्य : **रु. ७५/-फक्त**